# माणूस

शनिवार । १२ जानेवारी १९८० । ७५ पैसे




## द गॉल की हिटलर-मुसोलिनी ?

इतिहासाने पुन्हा एक संधी इंदिरा गांधींना दिलेली आहे.

?

# प्रतियोगी सहकारिता

**श्री. ग. मा.**

जे घडले ते अनाकलनीय आहे, तर्काला न जुमानणारे आहे. आपण इतक्या प्रचंड मताधिक्याने निवडून येऊ याची इंदिरा गांधींना तरी कल्पना होती का? आता त्या ठामपणे म्हणत आहेत की, ३५० जागांची आपली अपेक्षा होतीच. त्यांनी असा दावा करणे या विजयाच्या वातावरणात कुणी गैरही मानणार नाही. पण मग रायबरेली व मेडक या दोन्ही मतदार संघात उभे राहण्याचा द्राविडी प्राणायाम त्यांनी कशासाठी केला? तेव्हा त्यांनाही हा प्रचंड विजय म्हणजे आश्चर्याचा गोड धक्काच असला पाहिजे. इतर राजकीय नेत्यांचे, वृत्तपत्राचे अंदाज चुकले हेही मनमोकळेपणाने मान्य करायला हरकत नाही. ७७ ला ते जसे चुकले तसे ते आताही चुकले. ७७ मध्ये मतदान झाल्यावरही जनता नेत्यांना आपल्याला तके बहुमत मिळेल अशी निकाल लागेपर्यंत अपेक्षा नव्हती. इंदिरा गांधी पडतील, कांग्रेस उत्तरेत इतकी भुईसपाट होईल असा अंदाज कुणालाच अगोदर आला नाही. इंदिरा गांधीनाही आपण निवडून येणार नाही, आपल्या पक्षाचा पराभव होईल अशी थोडीफार जरी शंका आली असती तरी त्यांनी निवडणुका घेण्याचे या नाही त्या कारणास्तव टाळलेच असते. त्यांच्या सत्तेला त्या वेळी कुठलेही आव्हान वगैरे निर्माण झालेले नव्हते. लाख । दोन लाख लोक तुरुंगात सडत पडले असते तरी त्याची त्याना पर्वा नव्हती व देशही त्यामुळे काही बंड करून उठण्याच्या तयारीत वगैरे नव्हता. त्यांना आपण यशस्वी होऊ असे त्या वेळी वाटले म्हणूनच त्यांनी निवडणुका त्या वेळी जाहीर केल्या पण मतदारानी त्यांना चकवले. तसेच आताही झाले आहे. फक्त चकणारे बदलले. लाट उलटली. वादळाने दिशा बदलली. त्या वेळी आणीबाणीतील अत्याचारांमुळे लाट उसळली व तिने इंदिरा गांधीना गिळंकृत केले. यावेळी जनता नेत्याची भांडणे व नतर आलेल्या चरण-चव्हाण सरकारचा नाकर्तेपणा यामुळे लोकमत क्षुब्ध झाले व या क्षोभाच्या लाटेवर स्वार झाल्या इंदिरा गांधी. जनता पक्षाचा पराभव धोरणात्मक मुद्द्यावर झालेला नाही. २८ महिन्यांतली या पक्षाची कामगिरी तशी वाईट नव्हती व एकूण धोरणेही जी काही गांधी-नेहरूंच्या कांग्रेसने घालून दिलेली होती तीच जनता पक्षही पुढे चालवीत होता. थोडा भर विकेंद्रीकरणाकडे अधिक होता एवढेच फार तर म्हणता येईल. पण भांडणे फार माजली व मध्यवर्ती सत्ताच दुर्बल झाली. देश अराजकाकडे वाटचाल करू लागला व मतदार खवळले. आजवर त्यांनी मजबूत केंद्रसत्तेच्या बाजूने कौल दिलेला होता. ७७ मध्येही त्यांनी जनता पक्षाला याचसाठी भरघोस मतांनी निवडून दिले होते. पण जनता पक्षावरचा त्यांचा विश्वास ढळला व इंदिरा गांधीकडे पुन्हा ते त्याच अपेक्षेने वळले. वास्तविक जनता पक्षाला आणखी एक संधी मतदारांनी द्यायला हरकत नव्हती. ते न्यायालाही धरून झाले असते. पण वादळाला तू थांब व विचार कर असे सांगता येत नाही. सांगून काही उपयोगही नसतो. बोलूनचालून वादळच ते. जोवर संघटित पक्षपद्धती येथे रुजत-वाढत नाही तोवर हे असेच चालायचे. एखादे निमित्त घडणार आणि लोक भावनेच्या आहारी जाऊन या किंवा त्या बाजूने सुटलेल्या लाटेत वाहत जाणार. ७७ मध्ये झालेले मतदान हा लोकशाहीचा विजय वगैरे आपण मानला. पण ते नकारात्मक मतदान होते. तसेच आजही नकारात्मक मतदानच झाले. जनता पक्ष नको, ती *भांडणारी माणसे* नकोत असे मतदारांनी ठरवले व स्थिर सरकारचे आश्वासन देणाऱ्या इंदिरा गांधीना जवळ केले. त्यातल्या त्यात चरण-चव्हाण टाईप सरकारपेक्षा लोकांनी हा पर्याय निवडला हे चांगले झाले. बळकट केंद्रसत्ता ही या देशाची मूलभूत गरज आहे. आपली घटना जरी संघराज्यात्मक ( फेडरल ) पद्धतीची असली तरी केंद्र बळकट राहावे अशी सर्व व्यवस्था त्यात घटनाकारांनी करून ठेवलेली आहे. अद्वातद्वा स्वातंत्र्य येथील जनसमूहां-

मलपृष्ठ २ वर

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे

अंक : तेहतिसावा

१२ जानेवारी १९८०

किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी ।
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# दोन तात्यांची लढाई

पुण्यातील बाजीराव रोडवरच्या ज्या चौकाविषयी मी गेल्या एका लेखात लिहिले होते त्याच टेलिफोन भवन चौकात टेलिफोन भवनने उभारलेल्या ऐसपैस फलकावर निवडणुकीचे निकाल जाहीर होत होते. सकाळ संध्याकाळ, रात्र फलकासमोरच्या रस्त्याची गर्दी हटत नव्हती. ती वाढली की वाहने दुसरीकडून वाट काढीत होती. समोरच्या कट्टयावर बसून संध्याकाळ होत असता प्रकाश झोतात फुलून गेलेल्या फलकावरचे आकडे पहायला व लोकांची बोलणी ऐकायला मजा येत होती. कॉंग्रेस 'आय'च्या नावापुढे फळचावरच्या माणसाने शिडीवर चढून आणखी एक आकडा वाढवताच प्रेक्षकांतून आनंदाची आरोळी उठत होती व टाळचा वाजत होत्या. त्याच वेळी काही प्रेक्षकांच्या तोंडून उदास निश्वास सुटत होते. कोण जनतेचा आहे व कोण कॉंग्रेस आयचा आहे हे सहज त्याच्याकडे पाहून कळत होते. उतरलेले चेहरे जनताचे व प्रफुल्ल चेहरे कॉंग्रेस आयचे होते.

हे सर्व पहात असता मला तीन शिलेदार या कादंबरीची आठवण झाली. तींत राणीच्या पक्षाचा जय झाला की शिलेदार हर्षित होत आणि सेनापतीचे लोक चिडत. उलट राणीच्या पक्षाचा पराभव झाला की शिलेदार हताश होत व सेनापतीचे लोक जोरात येत. पूर्वापार चालत आलेल्या गोष्टी आताही तशाच घडत होत्या. फक्त आता राजेशाही नव्हती. लोकशाही होती. राजेराण्या किंवा सेनापती नव्हते. उमेदवार होते.

फळचावरचे निकाल पहात असता ही लोकशाही आहे हे पुन्हा एकदा अगदी डोळचासमोर सिद्ध होत होते. मतमोजणीच्या पहिल्या दिवसभर जनता पक्षाचे नावापुढे सात हा आकडा चिकटून होता. तो आकडा सोडण्यास फळा तयार नव्हता. तर कॉंग्रेस आयच्या पुढे आकडे रेसकोर्सवरच्या फेव्हरीटच्या गतीने वाढत होते. बसल्या जागेवरून उठून मी गर्दीत जाऊन उभा राहिलो. लोक काय बोलत आहेत मला ऐकावयाचे होते.

□

पुण्यात दिनांक ३ रोजी मतदान सुरू झाले. या वेळी सरकारी फतव्याने बूथ हा प्रकार काढून टाकला. त्या संध्याकाळी मी असे ऐकले की पोलीसदल त्यामुळे खूष होते. त्यांचा व्याप एकदम कमी झाला. पोलिसच काय पण मीही खूष होतो. माझ्यासारखे असंख्य खूष असतील. आजपर्यंत मतदानाचे दिवशी मतदान केन्द्रे उमेदवारांच्या बुथांनी वेढलेले असे. सूर्य जसजसा वर येई तसतशी बुथांवरील गडबड वाढत जाई. दिवसभरात तिथं हजारोची वर्दळ राही. हजारो पत्रिका, मतचिठ्ठ्या मतदारांना दिल्या जात. त्या रस्त्यावर पसरत संध्याकाळपर्यंत कार्यकर्त्यांचे चेहरे उन्हाने करपून काळे पडत, बूथांमधून कापडांच्या भिंतीवर लावलेली भित्तिपत्रके माना टाकू लागत, रस्त्यावर लावलेल्या पताका व निशाणे लोंबू लागत. बूथची कापडे फाटून ठिकठिकाणी बुथांना भोकसे पडत. संध्याकाळच्या वाऱ्याबरोबर, धूळ, खाली पडलेली पत्रके, व मतचिठ्ठ्या गटांगळचा घेत धावू लागत. कुठच्या दूरच्या बूथवर मारामारी झाल्याची बातमी येई. दिवसभराच्या धावपळीने थकलेले असूनही कार्यकर्त्यांच्या अस्तन्या वर जात. कुणीतरी वयस्क माणूस येऊन त्यांना शांत करी. मतदानाची वेळ संपताच कार्यकर्ते घरोघरी जाऊन बूथ मोकळे पडत. मग तर ते ओघळलेले, फाटके बुथ उदास वाटत. असे वाटे की लोकशाहीच थकली आहे.

या निवडणुकीचे वेळी बुथ नसल्याने लोकशाही थकली वाटली नाही. लोक आपल्या सवडीप्रमाणे येऊन मते देऊन येत होते. आमचे मत ज्या शाळेत होते तिथं शाळेच्या वेळीही जास्त वर्दळ असेल इतकी कमी वर्दळ होती. दुसरे दिवशी ठिकठिकाणची मतदानाची टक्केवारी आली ती सरासरी ५० होती. हा आकडा मात्र चिंताजनक होता. पुण्यातील पन्नास टक्के लोकांनी मतदान केले नसेल तर लोकशाहीच्या दृष्टीने बरोबर नव्हते. मतदार मत देण्याविषयी निरिच्छ होते. हा निरिच्छपणा वाढून जर ही टक्केवारी कमी होऊ लागली तर निवडणूक या शब्दाला अर्थ उरणार नाही.

गेल्या निवडणुकीपासून लेखकांनी प्रचारांत भाग घेण्याची पद्धत पडली. मला स्वतःला ती एवढी पसंत पडलेली नाही. पण अनेक लेखकांनी नानासाहेब गोरे व जनता यांजसाठी पत्रे लिहिली, लेख लिहिले, व्याख्यानाचे दौरे काढले. माझे स्वतःचे मत गोरे निवडून यावे असे होते. एक लेखक लोकसभेत जावा असे वाटत होते. चांगला लेखक लोकसभेला नक्की शोभा आणील. लेखकाला निश्चितपणे जास्त आवाका असतो. पं. नेहरू उत्तम लेखक होते. यावरून हे कळेल. पण गोरे निवडून आले नाहीत. लेखकांचे सध्या ठीक दिवस नसावेत.

□

प्रामाणिकपणे सांगावयाचे म्हणजे आकडे व राजकारण या दोन गोष्टीचे मला वावडे आहे. शाळेत जसा गणित हा विषय मला थकवा आणि तसाच थकवा निवडणूक व लोकशाही यावर 'संध्याकाळच्या पुण्या'त लिहिलेल्या तीन लेखानी मला आणला आहे. प्रचाराने लोकशाही येत असेल. पण हा प्रचार कमीत कमी असावा असे मला वाटते. माझे असे स्वप्न आहे की, एकही वाहन न फिरता, उमेदवारानी घरोघरी पायपीट न करता, भित्तीपत्रके न लावता, भिंती न चितारता, सभा न घेता, वर्तमानपत्रे, रेडिओ, टी. व्ही. व पोष्टाने पाठवलेली उमेदवारांची विनंतीपत्रे या मार्गांनी प्रचार व्हावा. मतदानापुरती सुट्टी घेऊन लोकांनी मतदान करावे. आपले काम बंद ठेवू नये. असे झाले नाही तर निवडणूक हा एक धदाच होऊन बसेल. मी असे ऐकलंय की इंग्लड्मधे निवडणुकीचे कॉंट्रॅक्ट घेणाऱ्या कंपन्या आहेत. उमेदवारास ते प्रचाराचा कार्यक्रम आखून देतात, सभाची तयारी ठेवतात, व्याख्याने लिहून देतात. उमेदवाराने फक्त कपनीने आखल्याप्रमाणे जाऊन सभेला उभे रहावयाचे. अशा कपन्या आपल्याकडेही निघू लागतील व पुढेपुढे आपणास धंदा मिळावा म्हणून या कंपन्या धडाधड मंत्रिमंडळे पाडून फेर निवडणुका घ्यावयास लावतील. अर्थात आपण जागृत राहून असे होऊ देणार नाही ते वेगळे.

पण कंपन्यानी कंत्राट घेतले नसताही यावेळी मध्यावधी निवडणुका झाल्या. मतमोजणीच्या दिवशी संध्याकाळी एक वृद्ध गृहस्थ मला भेटले. त्या वेळेपर्यंत काही निकाल बाहेर आले होते. ते गृहस्थ म्हणाले, 'साल्यांची डिपाझिटे जप्त झाली पाहिजेत. आपापसात भाडून मूर्खांनी नव्वद कोटीचा खर्च देशावर आणला.' या गृहस्थाचे भविष्य प्रत्येक तासाला खरे ठरत जाणार होते. जनता पक्षाचा दोनचा आकडा कित्येक वेळ पुढे सरकत नव्हता आणि सात आकड्याने तर काही तास घट्ट जागा धरून ठेवली. मोठ्या कष्टाने त्याला ढकलन आठने जागा घेतली. मग नऊ आला आणि पुन्हा चिकटून राहिले. सात तारखेस रात्री काँग्रेस आयला बहुमत मिळाले तेव्हा जनता पक्षाचा आकडा सतरा झाला होता. त्या रात्री दोन तृतियांश देश उल्हासात होता (मतदान केलेला देश) व एक तृतियाशावर पराभवाचा अंधार होता. पुण्यापुरते बोलावयाचे तर मतदान पुण्यात जवळजवळ निम्मे आनंदात व निम्मे कष्टी होते.

बाजीराव रोडवरचा टेलीफोनभवनाच्या भारलेल्या चौकात ते स्पष्ट कळत होते. निकालाच्या फलकासमोर रंगीत चादीचे कागद लावून काठीवर उभारलेला पंजा आनंदाने नाचत होता. काँग्रेस आयची निशाणे काठीवर लावून तीही फडकत होती. गाडगीळाच्या प्रत्येक वाढत्या मताला 'गोरे झोपले' अशा आरोळ्या उठत होत्या. तरुण मुले कट्ट्यावर व कुसावर बसलेली होती. कुणी पाढरपेशा समोरून जाताना दिसला की ते ओरडत होते 'काका! गोरेतात्या झोपले!'

मीही त्या गर्दीतून जात असता 'काका! पंजा आला' असा पुकारा झाला. तेव्हा मीही हात वर करून पंजा दाखविला. एकाने मला सागितले की, तोही गर्दीतून जात असता पुकारा झाला 'काका! गोरेतात्या झोपले' तेव्हा त्यानेही म्हटले 'पोरांनो! गाडगीळतात्या आले.' मी असे ऐकले की, गोरे व गाडगीळ यांच्या चुरसीला 'दोन तात्यांमधील लढाई,' असे सरकारी कचेऱ्यातून म्हटले जात होते. अर्थात ही सगळी त्या त्या वेळची गंमत.

◻

पण जे निष्ठेने व प्रेमाने निकालावर लक्ष देऊन होते त्यांना ही गंमत नव्हती. लागलेल्या निकालाने ते अक्षरशः कोसळले. जनता पक्षाच्या लोकप्रियतेचाच नव्हे तर जनता पक्षच लोकांचे कल्याण करील हे लोकाना पक्के पटलेले आहे व लोकदलाच्या फुटीरपणाचे जनता त्यांना प्रायश्चित देईल या खात्रीत ते होते. काँग्रेस आयचा एवढा विचार त्याच्या डोक्यात नव्हता.

पण लोकानी जे फुटले त्याना पाडले पण ज्या पक्षातून ते फुटले त्या पक्षालाही पुढे झोडपले. जरा त्रयस्थ नजरेने पाहिले तर या निकालामागे अनेक गोष्टी दिसतील बायकातील बोलण्यावरून माझ्या पत्नीने मला सांगितले की, मतदारात यावेळी स्त्रिया बहुसंख्येने आल्या व त्यानी इंदिरा गांधींना निवडून दिले स्त्रियानी मते देण्याचे कारण संतति नियमन. सतति नियमन असावे-नसावे हा पुरुषाना खेळ वाटतो. पण स्त्रियांना बहुप्रसावाच्या यातना प्रत्यक्ष भोगाव्या लागतात. त्यांना इंदिरा गाधीच्या वेळचे जोराचे संतति नियमन एकदम मान्य होते. त्यासाठी स्त्रियांची मते इंदिराबाईंना पडली.

हे कारण कदाचित पुरुष मान्य करणार नाहीत. पण त्यांत नवल नाही. स्त्रियाची मते पुरुषांना कधी कळली आहेत? स्त्रियाच्या मनातले न कळल्यामुळे नेहमीच पुरुषाना अनपेक्षित धक्के बसतात! असो. आणखी एक मुद्दा आला तो जगजीवनराम याच्याबद्दलचा. त्याना पंतप्रधानपद जनता पक्ष देणार यामुळे अस्पृश्य पंतप्रधान होणार ही गोष्ट नको असलेल्यानी जनतेच्या पाठिंबा काढून घेतला. हे खरे असले तर मात्र ही गोष्ट लोकांना भूषणावह नाही. जर जगाबरोबर जावयाचे असेल तर त्याना हा दृष्टिकोन पुढे मागे बदलावा लागेल.

या सर्वाबरोबर वाढत्या भावांना, अस्थिरतेला कंटाळलेल्यानी इंदिरा गांधी स्थिर सरकार देतील या भावनेने काँग्रेस आयला मते दिली हेही प्रमुख कारण संभवते. आता जनतेने कौल दिला आहे. कधी नव्हे इतक्या प्रचंड बहुमताने काँग्रेस आय पक्ष निवडून आला आहे. सत्ताधारी पक्षाने चूक करिताच लोकमत त्या पक्षाच्या हातातील सत्ता काढून दुसऱ्या पक्षाच्या हाती सोपवते. हा प्रकार दुसऱ्यांदा घडून आला. हा आमच्या लोकशाहीच्या डोक्यात तुरा आहे. यावेळी माझ्यासारख्याला गौतम बुद्धाच्या चरित्रात त्याने स्वतःचे विरक्त झाल्याचे कारण सांगितले ते आठवते. रोहिणी नदीच्या पाण्यावरून बुद्धाच्या शाक्य व पलीकडे कोलिय यात लढाया चालू असत. आपल्या गृहत्यागाचे कारण सांगताना गौतम बुद्ध म्हणाला, 'भिक्षू हो! दोघातली भाडणे जबरदस्तीने मिटवली गेली तरी ती मिटली नसती. कारण ज्याने पराभव करून ती मिटवली असती त्याला शेजारच्या तिसऱ्याशी पुन्हा शस्त्र धरावे लागले असते. त्या भाडणाना कंटाळून मी संन्यास घेतला.'

मानवी स्वभावातला हा दोष ओळखून गौतम बुद्धाने आपला कुठलाही अतिरेक त्याज्य ठरवणारा मध्यम मार्ग काढला. आता जय झालेल्या व पराजय झालेल्या दोन्ही पक्षानी मध्यम मार्ग लक्षात ठेवावा असे माझ्यासारख्या सामान्य माणसास वाटते. पक्षाच्या व पुढाऱ्यांच्या भाडणात सामान्य माणसाचा होणारा नाश वाचावा एवढेच. ◻

# इंदिरा तुफान : शिस्तबद्ध लोकशाही पक्षाची उणीव

वा. दा. रानडे

लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकात इंदिरा काँग्रेसने १९७७ चे अपयश धुवून काढले, एवढेच नव्हे तर १९७१ पेक्षाही अधिक यश मिळविले. वस्तुनिष्ठ अंदाज वर्तविण्यात राजकीय निरीक्षक आणि वृत्तपत्राचे वार्ताहर अयशस्वी ठरले. इंदिरा काँग्रेसला सर्वात जास्त जागा मिळवील, कदाचित अल्प बहुमतही मिळेल असे अंदाज काही निरीक्षकानी केले होते पण एवढे मोठे यश त्यानाही अनपेक्षित होते.

मतपेटीचा हा कौल विरोधी पक्षानी खुल्या दिल्याने मान्य करून आपणास अपयश का आले याचे कठोर आत्मपरीक्षण केले पाहिजे. १९७७ साली मतदारानी जनता पक्षास प्रचंड विजय मिळवून दिला तेव्हा जागरूक मतदार म्हणून आपण त्याचा गौरव केला होता त्याच मतदारानी आता इंदिरा काँग्रेसच्या बाजूने कौल दिल्यावर त्याचा हा निर्णय जागरूकपणाचा नाही असे म्हणणे कितपत योग्य होईल ? मतदाराच्या कौलाचे योग्य वस्तुनिष्ठ मूल्यमापन त्यावेळी आपण केले का आणि आताही करीत आहोत का ? मला असे वाटते की १९७७ च्या निवडणुकाचे आपण फार घाईने मूल्यमापन केले. आपल्या मतदाराचे मतदान मुख्यत. प्रविक्रियात्मक असते. सरकारी धोरणे व काराभाराबद्दलची नापसंती तो १९६७ पासून विशेष तीव्रतीने व्यक्त करीत आलेला आहे. प्रस्थापित सरकार पाडताना प्रभावी पर्यायी पक्ष कोणता याकडेही त्याचे लक्ष असते व केवळ सरकार पाडून न थाबता पर्यायी पक्षास तो मोठ्या बहुमताने निवडून देतो. १९६७ च्या निवडणुकीपर्यंत त्याला प्रभावी पर्याही पक्षच दिसत नव्हता. अगदी १९५२ च्या पहिल्या निवडणुकीपासून काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत नेहमी ५० टक्क्यापेक्षा कमीच मते मिळालेली आहेत. बहुसख्य मतदारांना काँग्रेस राजवट पसंत नसल्याचे त्यातून स्पष्टपणे दिग्दर्शित झाले तरीही काँग्रेस वीस वर्षे सत्तेवर राहिली. याचे कारण विरोधी शक्ती निरनिराळ्या पक्षात विभागलेल्या होत्या त्यामुळे त्याची मते आपसात विभागली जात होती. पर्यायी प्रभावी पक्ष नसल्याने काँग्रेस दर निवडणुकीत बहुसख्य जागा मिळवीत होती. पण १९६७ साली काँग्रेसविरुद्ध असतोष एवढा वाढला होता की राज्य पातळीवर तरी काँग्रेसला सत्तेवरून हटवायचेच मग तिच्या जागी कोणतीही सत्ता येवो असा मतदारांनी निर्धार केला आणि सात राज्यात काँग्रेसला सत्तेवरून हटवले पण काँग्रेसच्या जागी जी संयुक्त आघाड्याची सरकारे आली त्यानी जनतेची घोर निराशा केली त्याची प्रतिक्रिया म्हणून १९७१ च्या निवडणुकात मतदारानी सत्तारूढ काँग्रेसला मोठ्या बहुमताने विजयी केले. मोठ्या बँकाचे राष्ट्रीयीकरण, सस्थानिकाचे तनखे रद्द करणे यासारख्या धाडसी पावलानी इंदिरा गाधीनीही जनतेच्या मनात आशा निर्माण केल्या होत्या. पण जून १९७५ मध्ये अलाहाबाद हायकोर्टाने इंदिरा गाधीची निवडणूक रद्द करताच आपली सत्ता टिकविण्यासाठी त्यानी आणीबाणी पुकारली, लोकाचे नागरी हक्क हिरावून घेतले, वृत्तपत्राची गळचेपी केली पण लोकाना विशेष जाणवलेली गोष्ट म्हणजे नसबंदी मोहिमेत झालेले अतिरेक आणि अत्याचार १९७७ च्या निवडणुकीतील उत्तरेकडील कौल म्हणजे मुख्यत. या अतिरेकाविरुद्ध कौल होता. तसेच जनता पक्षाच्या रूपाने प्रभावी पर्यायी पक्ष उभा राहिला होता. म्हणून १९७७ मध्ये जनतेने काँग्रेसचा पराभव करून जनता पक्षाला मोठ्या बहुमताने सत्तेवर आणले. पण १९६७ नंतरच्या संयुक्त आघाड्याच्या सरकाराप्रमाणेच जनता सरकारने व पक्षाने लोकांची निराशा केली. या पक्षाने लोकशाहीची पुन: प्रस्थापना केली हे त्याचे मोठे कार्य, पण एकसंध पक्ष म्हणून हा पक्ष उभाच राहू शकला नाही. घटकपक्षातील भाडणे मिटविण्यातच त्याच्या नेत्याची शक्ती खर्च होऊन सामाजिक-आर्थिक कार्यक्रमावर तो फारसे लक्षच केंद्रित करू शकला नाही. अखेर फूट पडून जनता सरकार गडगडले. केंद्रात सरकार अस्तित्वात आहे की नाही अशीच परिस्थिती जनता सरकारच्या शेवटच्या काही आठवड्यात निर्माण झाली होती. तेव्हा सरकारचा नसण्यापेक्षा गैरकारभार केला तरी चालेल. पण सरकार अधिकारावर येऊ दे हा विचार मतदाराच्या मनात अखेर प्रभावी होऊन त्यानी इंदिरा गाधीच्या पक्षाला १९७१ पेक्षाही मोठ्या बहुमताने निवडून आणले.

इंदिरा काँग्रेसचा विजय हा मुख्यत: इंदिरा गांधीचा वैयक्तिक विजय आहे. मतदारानी त्याना पुन: संधी दिली आहे आणि त्याचबरोबर इशाराही दिला आहे. आणीबाणीतल्या चुका पुन: केल्यात तर तुम्हाला आणि तुमच्या सरकारला आम्ही पुन. सत्तेवरून दूर करू हाच तो इशारा आहे. पण निवडणुका पुन: होतील का की ही शेवटचीच निवडणूक ठरणार अशी चिंता व शंका काही राजकीय विचारवताना व नेत्याना वाटते. निवडणूक मोहिमेत तसा प्रचारही करण्यात आला होता. पण मतदारावर त्याचा प्रभाव पडला नाही. मतपेटी हा शाततापूर्ण मार्गाने सरकार बदलण्याचा लोकशाही मार्ग आहे. इंदिरा गाधी हुकूमशाही प्रवृत्तीच्या असल्या तरी हा मार्ग त्या कायमचा बद करतील असे लोकाना वाटत नाही. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या आपण नेत्या आहोत अशी आपली प्रतिमा त्यानाही जगात निर्माण करावयाची आहे. तेव्हा त्याच्या स्थानाला व सत्तेला जोपर्यंत धोका निर्माण होत नाही तोपर्यंत निवडणुकाचा मार्ग त्या बंद करतील असे वाटत नाही.

घटनेत आणि निवडणूक कायद्यात दुरुस्त्या करून आपली सत्ताच दीर्घकाल कशी राहील अशी तरतूद त्या करतील. अशी शक्यता काही राजकीय निरीक्षकांना वाटते. लोकक्षोभाचा अनुभव एकदा घेतल्यानंतर १९७५ ची पुनरावृत्ती त्या पुन: करतील असे वाटत नाही. पण वृत्तपत्रे आणि वृत्तसंस्था यांचा वापर सरकारी प्रचारासाठी मोठ्या प्रमाणावर केला जाण्याचा संभव आहे. यातून वृत्तपत्रस्वातंत्र्य कसे टिकवायचे या मोठ्या आव्हानाला वृत्तपत्राना तोंड द्यावे लागणार आहे. आणि खुल्या निवडणुकाचा मार्ग बंद झालाच तर क्रांतीशिवाय दुसरा मार्ग लोकांपुढे राहणार नाही. तशी वेळ येणार नाही व लोकशाही मार्गानेच भारतात सत्तांतर होत राहील अशा विश्वासानेच सर्व लोकशाहीवाद्याना लोकशाही टिकविण्याचे व बळकट करण्याचे कार्य पुढे चालू ठेवायला हवे.

इंदिरा गांधीनी मोठा विजय मिळविला. पण इंदिरा कॉंग्रेसपक्ष यापुढे लोकशाहीपद्धतीने कार्य करणारा शिस्तबद्ध पक्ष म्हणून कितपत विकसित होईल ? इंदिरा गांधींची कार्यपद्धती लक्षात घेता तसे होण्याची शक्यता दिसत नाही उलट इंदिरा होयबाचा पक्ष असेच स्वरूप त्या पक्षाला येणार असे दिसते. शिस्तबद्ध संघटित पक्ष उभारण्याकडेच पंडित नेहरूंच्या काळापासूनच दुर्लक्ष झालेले आहे आणि इंदिरा गांधींच्या काळात तर सत्तेचे राजकारण आणि त्यासाठी करावयाच्या कारवायातच हा पक्ष अधिकाधिक गुरफटत गेला. देशापुढील आव्हाने पेलण्यासाठी केवळ खंबीर नेतृत्व पुरेसे नाही. निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या शिस्तबद्ध पक्षाचे पाठबळ त्यामागे हवे. केवळ नोकरशाहीवर विसबून समाज परिवर्तनासाठी आवश्यक असलेले महत्वाचे निर्णय व कार्यक्रम अमलात आणता येणार नाहीत.

जनता पक्षातून असा पक्ष उभा राहील अशी आशा जयप्रकाश नारायण याना वाटत होती. पण घटकवाद व सत्तेच्या राजकारणातच हा पक्षही गुरफटला गेला. त्यांच्या काही नेत्यांना मूळ उद्दिष्टाचा विसर पडून त्यानी पक्ष फोडला. आणि इंदिरा गांधीना पुढे येण्याची संधी दिली. जनतापक्षाचा प्रयोग फसला असे मानून राजकीय शक्तीची नवी मांडणी करायची की पूर्वीच्या चुका सुधारून जनतापक्ष पुन: प्रभावी करणे शक्य आहे त्यासाठी कोणत्या पद्धतीचे व दिशेने कार्य करायला हवे याच्या कार्यकर्त्यांनी अंतर्मुख होऊन विचार करायला हवा.

संपूर्ण निकाल जाहीर होण्यापूर्वीच हा लेख लिहीत आहे. त्यामुळे सविस्तर विश्लेषण शक्य नाही पण या वेळच्या निवडणुकीत जे ठळक विशेष जाणवले त्याकडेच लक्ष वेधीत आहे.

आपल्याला जवळचा निकाल म्हणजे महाराष्ट्राचा. दोन वर्षापूर्वीच्या निवडणुकात जनता व त्याच्या मित्रपक्षानी ४८ पैकी २८ जागा जिंकल्या होत्या. या वेळी मित्रपक्ष दुरावून त्यानी लोकदल–कॉंग्रेस आघाडीची संगत धरली होती. आपली मते विभागली गेल्याने इंदिरा कॉंग्रेसला फायदा मिळेल. याची जाणीव अखेर होऊन समांतर कॉंग्रेस व जनता याच्यात अठरा जागाबाबत समझोता झाला होता; पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. इंदिराविरोधी शक्ती दुभंगलेल्या आहेत अशीच प्रतिमा जनमानसात निर्माण झाली व अशा दुभंगलेल्या शक्तीना मत देण्यापेक्षा इंदिरा कॉंग्रेसलाच मत देण्याकडे त्यांचा कल झाला. महाराष्ट्रात लोकसभेच्या एकूण ४८ जागांपैकी इंदिरा कॉंग्रेसला ३९, व जनता पक्षाला ८ व कॉंग्रेस लोकदलाला एक जागा मिळाली. जनता पक्षाला मिळालेल्या आठ जागात पाच मुबईतल्या, दोन रत्नागिरी जिल्ह्यातल्या व एक ठाण्याची आहे याचा अर्थ बाकीचा पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, व विदर्भ यात जनतापक्षाचा काही प्रभाव राहिला नाही. इंदिरा कॉंग्रेसच्या अपरिचित उमेदवारांनीसुद्धा जनताच्या वजनदार उमेदवाराविरुद्ध लाख दीड लाख मताच्या आघाडीने विजय मिळविले. महाराष्ट्रात जनता पक्षापेक्षाही मोठा पराभव कॉंग्रेसचा झाला. महाराष्ट्र हा यशवंतराव चव्हाणाचा बालेकिल्ला. हा बालेकिल्ला ढासळण्यास १९७७ मध्येच सुरुवात झाली होती. या वेळी तो पूर्ण ढासळला. फक्त यशवंतरावानी स्वत:ची जागा टिकवून महाराष्ट्रात त्याच्या पक्षाचे स्थान नाममात्र राखले, समातर कॉंग्रेस, दोन्ही कम्युनिस्टपक्ष व शे. का. पक्ष, रिपब्लिकन पक्ष यांना एकही जागा मिळाली नाही. १९७७ ची एकजूट भंगल्याचाच हा अपरिहार्यच परिणाम होता.

महाराष्ट्राशेजारची दोन राज्ये गुजरात व कर्नाटक पूर्णपणे इंदिरा गांधीच्या निशाणाखाली गेली. गुजराथेत सर्व २६ व कर्नाटकात २८ पैकी २७ जागा इंदिरा कॉंग्रेसने जिंकल्या. गुजरातेत १९७७ मध्ये जनतापक्षाने २६ पैकी १६ जागा जिंकल्या होत्या. १९७७ च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसचा पराभव करून गुजरातने इंदिरा गांधीना मोठा हादरा दिला होता पण आता तोच गुजरात पूर्णपणे त्याच्या प्रभावाखाली आला. इंदिरा कॉंग्रेसमधून देवराज अरस बाहेर पडल्यानंतर कर्नाटकात त्यांचा कितपत प्रभाव आहे याची कसोटी या निवडकीत लागली व अरस पूर्णपणे हटले. इंदिरा कॉंग्रेसचे उमेदवार अनेक ठिकाणी एक लाख दीड लाखाच्या आघाडीने निवडून आले. केन्द्रीयमंत्री टी. ए. पै तर दोन लाख मतानी पराभूत झाले. तामिळनाडूमध्येही इंदिरा कॉंग्रेस द्र. मु. क. आघाडीने मोठे यश मिळविले, जनता पक्षाने सत्तारूढ अण्णा द्र. मु. कशी आघाडी केली होती; पण अण्णा द्र. मु. क. चा प्रभाव आता राहिलेला नाही हे निवडणूक विभागात स्पष्टपणे दिसून आले.

इंदिरा कॉंग्रेसशी यशस्वी झुज मार्क्सवाद्यांनी केरळ, पश्चिम बंगाल व त्रिपुरामध्ये दिली. केरळमध्ये २० पैकी ११ जागा मार्क्सवादी आघाडीने जिंकल्या. इंदिरा कॉंग्रेसला फक्त ६ जागा मिळाल्या. केरळमधील जनता पक्षाने निवडणुकीत इंदिरा कॉंग्रेसशी समझोता केला होता.

उत्तरेकडच्या राज्याचा विचार करण्यापूर्वी दक्षिणेतल्या आणखी एका वैशिष्टयपूर्ण निकालाचा उल्लेख करायला हवा. तो म्हणजे गोव्याचा. सबंध देशाला इंदिरालाटेने झपाटले असता गोव्यात मात्र ती दिसली नाही आणि सर्वत्र मोठा पराभव झालेल्या कॉंग्रेसला गोवा विधानसभा निवडणुकात मात्र निर्णायक बहुमत मिळाले. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला ३० पैकी फक्त ६ जागा मिळाल्या. स्वत: मुख्यमंत्री श्रीमती शशिकला काकोडकर पराभूत झाल्या. गोव्याचे मुक्तीपासून तेथे असलेली म गो. पक्षाच्या सत्तेची मक्तेदारी सपुष्टात आली. इंदिरा कॉंग्रेस व

पृष्ठ १७ वर

# इथे आहे फक्त पैसा, चिक्कार पैसा

## सौ. माधुरी बापट ( अमेरिका )

अमेरिकेत जे पाहाव ते आपलं 'ए वन्' ग्रेडचं ! अन्नपदार्थ, कापड-चोपड, फर्निचर, अप्लायसेन्स, काहीही. परंतु देशोदेशी जी देश-भक्ती आढळते ती कुठल्याच ग्रेडची इथे पहायला मिळाली नव्हती. विशेषतः गेले दोन महिने चालू असलेल्या इराण-प्रकरणामुळे तिचा तुटवडा फारच जाणवत होता. देशभक्ती आणि अमेरिकेत ? काय गमत करता काय ? इथे सर्व काही उत्तम प्रतीचं मिळेल पण– देश-भक्ती ? त्यासाठी दुसऱ्या किंवा तिसऱ्या जगाची बाजारपेठ मोठी आहे. ह्या पहिल्या जगात ती एक गोष्ट सोडून बाकीच विचारा. हे १ लं, २ रं, ३ रं जग, ही काय भानगड ? पृथ्वीवर तर एकच...! शंका बरोबर–त्यांचं असं आहे, की जगात ह्या दोन मोठ्या शक्ती कंट्रोल करतात. सर्व काही, तेव्हा १ लं जग म्हणजे अमेरिका अर्थात–USA, २ रं जग म्हणजे रशिया USSR नि ३ रं जग म्हणजे ही दोन्ही जगं सोडून उरलेल पृथ्वीवरच जग–अर्थात १०० कोटी लोक-संख्येने भरलेल्या चीनपासून ते सिलोनपर्यंत सर्व देश !

तेव्हा उत्तम प्रतीची देशभक्ती शोधायची असेल तर २ ऱ्या, ३ ऱ्या जगात जा. २ ऱ्या जगात ? रशियात ? तिथे तर कम्यु-निझम...! हो, तरीपण तिथ उत्तम प्रतीची देशभक्ती जगत आहे. खरं सागता ? कॉम्रेड शप्पथ !

तुम्हाला तो न्युक्लिअर सायंटिस्ट माहिती आहे किनी ? कॅपिट्झा. इंग्लंडमध्ये २० व्या शतकातल्या दि ग्रेट शास्त्रज्ञाबरोबर काम करणारा– त्याचं काय ? सर्व मोहावर लाथ मारून तो गेला परत. रशियात–देशप्रेमापायी ! आणि तिथे जाऊन बिचाऱ्याची काय अवस्था झाली माहिती आहे ? हायड्रोजन बॉंब बनवायला सपशेल नकार दिलान् तर कॉम्रेडने त्याच्या आयुष्याची धुळदाण उडवलीन त्याची एवढी मोठी सुसज्ज प्रयोगशाळा– पार जमीन-दोस्त ! त्याच्याबरोबर तरुणपणी काम करणाऱ्यानी केव्हाच नोबेल प्राइसेज् मिळवली अन् हा बिचारा जन्मभर नजरकैदेत राहून आयु-ष्याच्या शेवटी केव्हातरी त्या बक्षिसाचा मानकरी ठरला !

मग शेवटी रशियाचा हायड्रोजन बॉंब बनविला कुणी ? शू ! विचारायचं नाही. कानात सागू ? कुणाला सागू नका. सॅकॅरोव्ह ! पण हे सर्व देशप्रेमापायी ? स्वतःच्या बुद्धिमत्तेवर, करीयर, जाणून-बुजून संकट ओढवून घेणं म्हणजे...! आहे किनी...रशियन जित्या-जागत्या देशभक्तीचे उदाहरण ?

आपले नारळीकरसुद्धा...होय हो, हे पहिल जग सोडून सर्व जगातच...

व्हिएटनाम वॉर आठवतं ना ? व्हिएटनामी सैनिक कसे लढले होते ? अर्धपोटी तर खरेच, मशिनगन्सचे जुजबी शिक्षण, घालायला युनिफॉर्मही नाही–लंग्यात लढले हो लंग्यात ! तेव्हा हे अमेरिकन्स–आयुष्यात कधी कष्ट ही चीज ठाऊक असली तर–काम करतील ते पण हातात पेप्सीची कॅन घेऊनच ! लंच टाइममध्ये एक मिनिटसुद्धा कमी झालेलं खपत नाही त्यांना. भारतात असताना बरेच ऐकले होते इथल्या कामगाराविषयी – की खाताखाताच काम करतात. तेव्हा वाटायचं की जेवायलाही वेळ दवडत नाहीत–छे हो ! कसल काय? जेवायच्या वेळेत तर हादडतातच पण कामाच्या वेळेतही तोंड चालूच असते ! जन्माला आल्यापासून कार. अनवाणी पायानं उन्हातान्हात शाळेसाठी दोन दोन मैल चालणारी आपल्या तिकडची मुले कुठली नि इथली...लढतायत कसले हाका मारायला ? हातात पेप्सीची कॅन घेऊन बाजूला म्युझिक ऐकत जमलं तर एक गोळी मारू म्हणणार !

आपल्याला तिकडे उगीचच वाटतं की उंच तगडे अमेरिकन्स वॉरमध्ये पण चागली तलवार गाजवत असतील. उजेड ! बुद्धीची तलवार गाजवतात ते त्याचे नेते नि शास्त्रज्ञ ! त्यांच्या जिवावर तर देश चाललाय ! व्हिएटनामीज्नी ह्यांच्या रेजिमेंट्सची पळता भुई थोडी केली. आपल्या तिकडे नाही का– गुरखा, मराठा रेजिमेंट्स बेष्ट ! गुजराथी, मारवाडी बनिये का कधी गल्ल्यावर बसायचं सोडून तलवार गाजवायला जातात ? जगातले सगळे नंबर एकचे चोर बनिये भरलेत इथे ! इथे सगळे स्वदेश सोडून नशीब काढायला आलेले विदेशभक्त ! त्याच्याकडून कसली देशभक्तीची अपेक्षा करता ? आणि हे नुकते घडलेले रामायण नाही. कोलंबसने शोध लावल्यापासून धडाधड सर्व जगातून–विशेषतः युरोपातून– जे लोक आले ते विशिष्ट हेतूने. त्यावेळी, इथले मूळचे रेड इंडियन्स धनुष्य-बाणाच्या युगात होते, त्यांचा बंदुकीसमोर काय टिकाव लागणार ?

इथे येणाऱ्या एक-दोन पिढ्याना स्वदेशाचे थोडे फार प्रेम असते. इंग्लड, इटली, जर्मनी, जपान वगैरे. पण पुढच्या पिढ्याचे काय ? त्याच्या रक्तात कुठलीच देशभक्ती नाही. ज्याच्या नुसत्या आठवणीने बाहु फुरफुरावेत असे शिवाजी, नेपोलियन इथे झालेत कुठे ?

मग ह्याच सैन्य बनतं कसं ? बनतं असंच. रेडियो, टी. व्ही. पेपरमधून लंब्याचौड्या जाहिराती येत असतात – आर्मी, नेव्ही, एअरफोर्स नि मरीनमध्ये रुजू व्हा म्हणून ! त्याची भाषासुद्धा कशी असते पहा–देशसेवेसाठी, मातृभूमीसाठी वगैरे शब्द–विसरा !

आयुष्यात एक करीअर करण्यासाठी, दोन वर्ष व्हेटरन म्हणून काम केलं की पुढचे शिक्षण मोफत मिळते वगैरे वगैरे अभिलाषायुक्त ! नाहीतर इथले महागडे कॉलेज शिक्षण सर्वसामान्याना काय परवडणार आहे ?

बाकी ह्यांना मैदानी लढाऊ सैन्याची तशी गरजच काय म्हणा ! तसा अॅटॅक करणारे कोण इथे ? कॅनडा नि मेक्सिको म्हणजे ह्यांच्या ताटाखालची माजरं ! तेव्हा रशियाच्या मिसलसना उत्तर द्यायला इथली मिसल्स पुरेसे आहेत–नि बाकीचं सगळं पुढारी नि शास्त्रज्ञ पाहून घेतातच आहेत.

आपल्या तिकडे सैन्यातला–मग तो साधा शिपाई असू दे–समाज एका आदराने त्याच्याकडे पाहतो वॉर सुरू झाले–मग ते चीन, पाकिस्तान, गोवा–कसलेही, की भरती व्हायला तरुणाच्या रागा लागतात ज्यांना नकार मिळतो ते बिचारे हिरमुसले होतात. NDA मध्ये प्रवेश मिळाला नाही म्हणून दरवर्षी निराश होणाऱ्या तरुणाची तर अगदी गणतीच नाही. ह्या देशप्रेमी तरुणाचे पूर्वज कुठेतरी शिवाजी, तानाजी, पेशव्यांच्या रक्ताचे असतात. लढाईवर त्यांना त्याच्या बायकामुलांची काळजी नसते समाज, सरकार योग्य ते पोषण, संरक्षण देईल याबद्दल ते निर्धास्त. या उलट इथे–वॉरवरून नवरा परत येण्याआधीच बाईने यार गाठलेला असतो. हायपाय मोडून लढाईत Handicap झालेल्याचे हाल तर कुत्रे खात नाही समाजात त्यांना आदर तर राहू देच, पण निरुपयोगी म्हणून कोणी कामही देत नाही. सरकारने दिलेले पेन्शन पुरत नाही. असे सैनिक टी. व्ही. वरसुद्धा समाजाविषयी, सरकारविषयी चिडीने बोलत असतात–झक मारली नि वॉरवर गेलो म्हणतात, आपल्या तिकडे वॉरवर मोडलेला हात-पाय अभिमानाने दुसऱ्याला दाखवतील. पण इथे–

व्हिएटनाम वॉर सुरू झाल्यावर सरकारला कंपलसरी भरती तर करावी लागलीच. पण त्याची कुणकुण लागताक्षणी बायकामुलं सोडून सगळे पळपुटे पळाले कॅनडा नि मेक्सिकोत नि तिथेच लग्नं करून राहिले. कित्येक तर कॉलेजच्या धर्मशास्त्र विभागात नि चर्चमध्ये पाद्री म्हणून भरती झाले. त्यांची देवभक्ती अगदी उतू जाऊ लागली. का ? तर पाद्र्याना भरतीचे कंपल्शन नाही –

त्यातूनही ज्यांना जावेच लागले, अशातल्या कित्येकांना वॉर संपल्यावर सायकिएट्रिक पेशंट मधून विनाकरण हॉस्पिटलमध्ये राहावे लागले. mind control pills ने कित्येकांची मनेच उद्ध्वस्त झाली. दहा वर्षांपूर्वी झालेल्या वॉरचे असे after effects नि त्याची विश्लेषणे ह्यावर इथले समाजशास्त्रज्ञ नि मानसशास्त्रज्ञ काथ्याकूट करीत आहेत; पण निराश झालेल्या, मानसिकरीत्या खचलेल्या सैनिकांना कोणी साधी आपुलकीही दाखवत नाही. नोकरीवर घेणं बाजूलाच, कारण इथं म्हणजे गरज संपली की लाथ मारून हाकलून लावायची पॉलिसी !

सध्या चालू असलेल्या इराण बरोबरच्या संघर्षामध्ये नुकत्याच पाकिस्तानात जाळलेल्या अमेरिकन एंबसीमध्ये ह्याचा एक मरीन कॉप मरण पावला हे सर्वश्रुतच आहे. त्यावर त्याच्या आईची प्रतिक्रिया पाहा कशी – 'आता यापुढे मी माझ्या एकाही मुलाला सैन्यात पाठवणार नाही.' असे हे मातृत्वाचे नमुने ! इथे जिजावाईच जन्माला येत नाही तर शिवाजी कुठला ?

नि अशा परिस्थितीत उत्तम प्रकारची देशभक्ती तरी पिकणार कशी ?

### इथे फक्त पैसाभक्ती

इथल्या सुपीक मातीत सर्वांत जास्त काय पिकत असेल तर तो पैसा ! सरकारी मिंटमध्ये डॉलरच्या नोटांच्या थप्प्या छापत असतात. लहानपणापासून मुलांना सर्वांत जास्त ओळख कशाची असते तर ती 'बक्स्'ची ! कुठल्याही गोष्टीचा मोबदला केवळ पैशातच मोजायचा मग ते मातृप्रेम असू दे की अपत्य प्रेम असू दे. एखाद्या गोष्टीपासून मिळणारे मानसिक समाधान ही गोष्ट त्यांच्या गावीही नसते. प्रत्येक कामाची किंमत 'किती डॉलर पर अवर ?' वर अवलबून ! तेव्हा ही मोफतची देशभक्ती कोण करणार ? ही 'देशभक्ती' करायचे 'डॉलर्स पर अवर' किती मिळतील ते सागा आधी !

पैसा मिळाला की देशभक्तीच काय पण देशद्रोही पण बनतील. जान गेली तरी देशद्रोही होणार नाही, ही आपली सर्वसामान्य भावना असते. सध्याच्या इराण क्रायसेसमध्ये इराण्यांची केस कोर्टात लढवणारे इथले वकील खरे महाभाग– त्याचे मिळणाऱ्या फीशी कर्तव्य मग पक्षकार इराणी असो वा जपानी ! उगीच नाही आपले नानी पालखीवाला कंटाळले इथल्या वकिलीच्या बुजबुजाटाला ! इंदिराबाईंची केस तर त्यांनीच धुडकावून लावली होती !

मला आठवतं आपल्या तिकडे crime cases लढून जिंकण्यामध्ये हातखंडा असलेल्या पुणेरी वकील महाशयांनी प्रसिद्ध जोशी–अभ्यंकर खून खटल्यातील गुन्हेगाराची केस लढवायला सपशेल नकार दिला होता. तिथे एक वेळ मनाची नसेल तर जनाची तरी ठेवावी लागते. इथे जनताच निर्लज्ज तर मनाच्या लाजेचा उजेडच !

देशभक्तीच काय पण कुठलीही गोष्ट इथे खातात कशाशी तर पैशाशी ! डॉलरच्या नोटेत गुंडाळून विष दिलं तरी खातील ! देवदयेने इथे इतके पिकते परंतु त्याचे चागले खमंग, चमचमीत जेवण काही बनवता येत नाही इथल्या स्त्रियाना ! स्वैपाक करणे म्हणजे काय मॉर्डनपणा झाला का ? केलाच तर त्याबद्दल नवऱ्याकडे पैशात मोबदला मागणारी गृहिणी–नवरा कामावरून थकून आला की, चल मॅकडॉनल्डमध्ये हॅंबरगर खायला म्हणणार. गरम जेवण बनवणं दूरच मग सर्व्ह करण बाजूलाच ! कारण इथे सर्व समान ना ?

भारतीय स्त्री सर्वांचे जेवण झाल्यावर जेवते हे ऐकून तोंडात बोट घालतात–काही जुनाट, बुरसटलेले म्हणतात, पण आमच्या नौरोजीनी घरून नेलेल्या भारतीय पदार्थावर तुटून पडतात. त्याचे फॅक्टरीतले सहकारी ! त्यांच्याच देशात पिकणाऱ्या पदार्थांपासून इतके चविष्ट अन्न बनू शकते यावर विश्वास नाही बसत हो त्यांचा ! आमच्या नवऱ्यांना भलत्या चवी लावते म्हणून त्यांच्या बायका एक दिवस ओरडणार आहेत माझ्याविरुद्ध !

पण इथे हॉटेलात मिळतो तो पिझ्झा नि स्पगेटी. इटालियन नाहीतर मेक्सिकन वा चायनीज फूड पण अमेरिकन काय ? तर तो पैसा– तो फक्त अमेरिकन ! नुकतीच वाचनात एक मनोरंजक गोष्ट आली–देशोदेशीच्या लोकाच्या आनंदाविषयीच्या कल्पना – इंग्लिश म्हणतो विनोदी वृत्तीने आनद मिळतो, ग्रीक माणसाला सच्चाईमध्ये

सुख मिळते, ऑस्ट्रियन म्हणतो आरोग्य म्हणजेच जीवनातले सर्व काही. पण अमेरिकन ? त्याचे सर्वस्व कशात म्हणाल तर पैशात ! फक्त पैशात !

शेवटी ह्या डॉलरवरही संकटं आली. बिचारी सुसान अँथनी – स्त्री स्वातंत्र्य, समान हक्कासाठी सर्व आयुष्य वेचलेन् – अन् ह्या वर्षी डॉलरवर बसली खरी पण ते जे घसरत चाललंय की त्याची घसरण थोपवता थोपवता इथल्या अर्थशास्त्रज्ञांच्या नाकी नऊ आले. बाहेरच्या जगात जर्मनी, जपानने तर ते घ्यायचेच बद केले.

### इराणच्या दाढीवाल्याने देशभक्तीस लावले

अशा ह्या पैशावर नाचणाऱ्या दुनियेला देशभक्तीची किंचितशी जाणीव करून द्यायचे काम कोणी केले असेल तर ते आयातोलाने ! त्याने जे केले ते बरोबर की चूक ह्या प्रश्न वेगळा पण ह्या प्रकरणाने अमेरिकन पब्लिकला देशभक्ती ही काय चीज असेल याची जाणीव झालीय्. पर्ल हार्बरला जपान्यानी दाखवलेल्या हिसक्यानंतर बरेच वर्षांनी तसा हिसका दाढीवाल्याने दाखवला खरा !

अमेरिकन ओलीस ठेवून घेऊन शहाची मागणी करण ही तशी काही इतिहासातली नवीन गोष्ट नाही. पण इथे प्रत्येक गोष्टीचे ट्रेनिंग मिळावे लागते व इथल्या लोकाना होस्टेजेस असताना कसे वागावे याचे म्हणे कधीच ट्रेनिंग दिले गेले नाही. आपल्या सभाजीराजांना कधी असं ट्रेनिंग दिलं होतं ? डोळे फुटल्यावर तो वाघाचा बच्चा देशप्रेमीच होता. अन् इथे होस्टेजेस म्हणतात 'द्या सोडून शहाला !'

बाकी बिचाऱ्या त्या शहाची कीव येते. एकेकाळचा देशाचा सम्राट – आज कुठलाही फडतूस देशसुद्धा त्याला आश्रय द्यायला राजी नाही. हो जळता निखारा कापसावर ठेवल्यासारखं ! इराणी बसलेच आहेत होस्टेजेस धरून ठेवायला ! सर्वांनाच आपापल्यापुरती काळजी. कसं जग असतं पहा ! खुर्चीवर होता तोवर केवढी त्या शहाची हाजी हाजी ! सगळेच उगवत्या सूर्याचे साथीदार !

त्या वेळी त्याचे खास मित्र असलेले इथले रथी–महारथी–निक्सन, किसिंजर, रॉकफेलर आता सगळे काखा वर करून मूग गिळून स्वस्थ ! त्या वेळी असलेली जबाबदारी त्यानी पार पाडली. आता त्याचं काय ? ८० साली होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी उभे राहणाऱ्या होतकरू उमेदवाराचीही ह्या बाबतीत आळीमिळी ! हे प्रकरण आत्ताच आटपलं तर बरं ही भावना ! हो आपण प्रेसिडेंट झाल्यावर नको ते लफडे निस्तरायला !

अशा वेळी शक्य तेवढ्या जास्तीत जास्त धीमेपणाने एफिशियन्सीने सध्याचे अध्यक्ष ते निस्तरत आहेतच. सर्वांनीच ह्याबाबतीत कार्टरच्या निर्णयाचे कौतुक केलंय्. त्याच्या जागी दुसरा कोणीही असता तरी ह्याच्याशिवाय जास्त चांगलं करू शकला असता असं वाटत नाही.

पुष्कळाना JFK च्या वेळचा क्यूबातला रशियाबरोबरचा संघर्ष आठवतो व त्यावेळची त्याची धडाडी ! पण तेव्हाची परिस्थिती वेगळी होती. आता कार्टरने तसा स्मार्टनेस दाखवला तर जगाच्या अंतालाच निमंत्रण !

धार्मिक कार्टरने सर्वच होस्टेजेस सुखरूप परत येईपर्यन्त सर्व ठिकाणच्या चर्चेसमधून रोज ठराविक वेळ घंटानाद करण्याची ऑर्डर काढली आहे. आणि ती मनोभावे बजावलीही जातेय. आश्चर्य आहे किनी ? संकटनिवारणासाठी महादेवावर ओलेल्याने अभिषेक धरण्यापैकीच !

सर्व होस्टेजेस सुखरूप परत येईपर्यंत व्हाइट हाऊस समोरच्या नॅशनल Xmas tree वरचे दिवेपण प्रज्वलित होणार नाहीयेत. ऐन दिवाळीत दुःखाचं सावट आलं की घरच्या पणत्या नाही का विझून जात ?

जनतेला उद्देशून भाषण देताना, एखाद्या गोष्टीसाठी आवाहन करताना कार्टरचे शब्द निघतात ते अगदी हृदयापासून ! ह्या गोष्टीचे सर्व कौतुक करतात.

पण तो जीव तोडून सागत असतो की, पेट्रोल कमी वापरा, एनर्जी कॉन्झर्व करा. त्याकडे सर्व पद्धतशीरपणे दुर्लक्ष करतात. एनर्जी क्रायसेसचा प्रश्न सोडवतील कार्टर नि त्याचा एनर्जी सेक्रेटरी. आमचा काय संबंध, ही भावना ? ह्याच्या घरात थार्मोस्टार ७०–७५° वरच राहणार नि सुट्या आल्या की बर्फातसुद्धा वेड्यासारखे ड्रायव्हिंग करणार !

एवढे होस्टेजेस् तिकडे अडकलेत त्याची चिंता ह्याना कसली ? कार्टर नि स्टेट सेक्रेटरी पाहात आहेतच सर्व ! Xmas खरेदीचीच ह्याना चिंता ! मला आठवतं, आपले लाडके लालबहादूर शास्त्री यानी आठवड्यातून एक दिवस एक वेळ उपास करावा असे सांगितल्यावर एक प्रकारच्या श्रद्धेने तमाम जनतेने ही गोष्ट पार पाडली.

आणि इथे– उपास तर सोडाच– साधा मतदानाचा हक्कही चोख बजावत नाहीत. धक्का बसला ना ऐकून ! मलाही बसला होता, प्रथम जेव्हा मी त्याविषयी वाचले तेव्हा ! देशोदेशीच्या मतदानाची टक्केवारी एकदा वाचली होती. तेव्हा सर्व प्रगत देशात अमेरिकेचा नबर खाली ! इतर हक्कांसाठी जिवाचं रान करणारी ही लोकं मूलभूत कर्तव्य बजावण्यात कमी पडतात याचं आश्चर्य करावं तेवढं थोडंच !

आशियाई गरीब देशात अन्नासाठी होणाऱ्या भाडणांना हसणारी ही जनता–आता कारच्या गॅससाठी क्यूमध्ये उभे राहून कंटाळतात नि मारामाऱ्या करतात ! काही म्हणा पगडीधराने धडा चागला शिकवला ! आता पेट्रोलचे रेशनिंग सुरू होईल तेव्हा कळेलच.

शिवाय होस्टेजेसपैकी फक्त काळे निग्रोच परत पाठवून 'तेहरान'ने काडी टाकलीच आहे. आधीच इथे काळ्यागोऱ्याचे फार सख्य ! माऊंटबॅटनने नाही फाळणी करून भारत पाक संघर्षाचं घोंगडं भिजत ठेवलं ? आणि दोघानाही शस्त्रे पुरवून अमेरिकेनेच तर आपली पोळी भाजली. जगात सर्वत्र शांतता नांदली तर यांचे पेंटॅगॉन चालायचे कशावर ?

इतके दिवस हा उद्योग वेस्टर्न वर्ल्ड करीत असे, आता त्याचे चार दिवस सपुष्टात येऊ लागल्यावर ईस्टर्न वर्ल्डचे हिसका दाखवायचे चार दिवस सुरू झालेत. नुकतंच नाही अमेरिकेनं नाकारलेलं ऑईल इराणनं जपानलाच कमी भावात विकलं ? नुसती गंमत पाहत राहा. कारण आपण नेहमीप्रमाणेच तटस्थ असलेलं बरं !

### देशभक्तीची ' ब्लू बुक ' किंमत

ही देशभक्ती उदयाला येण्यापूर्वी इथे अजिबातच देशभक्त नव्हते असे नाही. पण एकूण जनतेची टेन्डसी अशी; पण तसे देशभक्त असणाऱ्यांना त्याची काय किंमत मोजावी लागते याचे एक गंमतीशीर उदाहरण ऐकायचेय ?

एक प्रसिद्ध वकील महाशय हयातीत रगड पैसा कमवून बसले होते. नवल नाही ! डॉक्टरांच्या खालोखाल ह्या देशात त्याचीच चलती ! त्यांचे देशप्रेम त्यांनी एके वर्षी IRS जास्तच टॅक्स भरून व्यक्त केले. देशाला एक मदत म्हणून ! पण त्याचे हे देशप्रेम इथल्या बिनहृदयाच्या (बिन डोक्याच्या कसं म्हणणार ?) कॉम्प्युटरला कसं कळावं ? त्याने उलटे प्रश्न विचारून व त्याच्या संपत्तीचे इनव्हेस्टिगेशन करून, त्या वकील महाशयांना सळो की पळो करून सोडले. कुठून त्या देशभक्तीला बळी पडलो असे झाले त्याना !

इथले कॉम्प्युटर्सही पैसा भरूच ! कारण अमेरिकन बनावटीचे ! किती झाले तरी त्याचं आयुष्य मर्यादितच ! बिचारे म्हातारपणाने कुरकुरायला लागले तर त्यात त्याचा काय दोष ! पण होणाऱ्या विमान अपघाताचे खापर त्याच्या माथी फोडतात. आता त्यांचे झिजलेले पार्टस् बदलायलाही माणसंच हवीत ना ?

पण एकूण ही ' अमेरिकन मेड ' तऱ्हाच अशी– कार घ्या ५ वर्षात Blue Book value zero. कुठलंही अप्लायन्स घ्या ५-१० वर्षात त्याचे बारा वाजलेच. घरं तर अशी बांधतात की वाऱ्याने उडून जावीत. सर्व काही बाह्यत्वे शोभिवंत, आकर्षक ! खरी जन्मभर टिकणारी गोष्ट पाहायची तर Made in Germany, Japan अगदी India सुद्धा ! आणि कालच रात्री टी. व्ही. वर एका होस्टेजचा Live इंटरव्यू पाहिला. (NBC च्या वार्ताहरांची बाकी शर्थ ! ) ते मिशापण न फुटलेलं कोवळ पोर ज्या धीमेपणानं उत्तरं देत होतं ते पाहून खर सागते डोळ्यात पाणी तरळलं ! सध्याच्या संघर्षातून निर्माण झालेली ही कोवळी देशभक्ती !

ती तरी हयातभर टिकेल याची काय गॅरंटी ! इथे सगळ्याचीच गॅरंटी ३ महिने, ६ महिने फारतर १ वर्ष ! एवढा इराण सघर्ष संपल्यावर – कोवळ्या देशभक्तीची गॅरंटी संपल्यावर – ती पण भूतकाळाच्या गार्वेजच्या डब्यात पडली तर त्यात आश्चर्य कसलं ? □

---

## अफगाणिस्तानातील रशियन हस्तक्षेप

# इस्लामी पुनरुज्जीवनवादाकडे दुर्लक्ष नको

**मुनीर सय्यद**

अफगाणिस्तानमध्ये केलेल्या हस्तक्षेपाची जगभर विरोधी प्रतिक्रिया होत असताना रशियाने लष्करी कारवाई चालू ठेवली असून त्या देशाला आपल्या प्रभावाखालून रशिया निसटू देणार नाही हे स्पष्ट केले आहे.

रशियाची कृती आंतरराष्ट्रीय कायदा व नैतिकतेच्या तत्त्वांची तर उघड पायमल्ली आहेच परंतु ' पाकिस्तान व अमेरिकेच्या हस्तक्षेपाविरुद्ध अफगाण शासनाच्या विनतीवरून केलेली कृती ' या रशियाच्या म्हणण्यातही तथ्य नाही असे आता स्पष्ट झाले आहे.

रशिया भारताचा मित्र असला तरी हा बलाढ्य मित्र हातात शस्त्रे घेऊन जवळ यावा असे भारताला वाटणार नाही यावरोबरच अमेरिकेने आधी अफगाण बडखोर व आता पाकिस्तानला लष्करी मदतीची केलेली घोषणाही भारताच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. विशेषत: अमेरिका-पाकिस्तान या फळीमध्ये चीन सामील आहे हे लक्षात घेतले म्हणजे भारताला निर्माण होऊ शकणाऱ्या सभाव्य धोक्याची कल्पना येते.

या परिस्थितीमध्ये राजकीय परराष्ट्रीय संबंधातील दक्ष मंडळी, पत्रकार व विचारवंत भारताने घ्यावयाच्या भूमिकेसंबंधी विविध मते व्यक्त करीत आहेत. परंतु यामध्ये प्रामुख्याने एक बाजू दुर्लक्षिली जात आहे असे वाटते. म्हणून हा प्रपंच.

भारताला धोका चीन-पकिस्तानकडूनच सभवतो एवढे म्हणणे पुरेसे नाही. नकाशावर नजर टाकल्यास आपल्या असे लक्षात येते की, भारत मुस्लीम राष्ट्रांनी वेढलेला आहे. पश्चिमेला सौदी अरबस्तान, आखाती देश, तुर्कस्तान, इराण व पूर्वेला बागला देश, मलेशिया, इंडोनेशिया हे देश अशी परिस्थिती आहे.

इतिहासामध्ये भारतावर झालेली आक्रमणे व ही भौगोलिक परिस्थिती याची जाण असणाऱ्या पं. नेहरूंसारख्या दूरदर्शी नेत्यांनी परराष्ट्रीय धोरण आखताना या मुस्लिम राष्ट्राच्या वेढ्याची काळजी वाहिली होती. या फळीला कुठेतरी फोडून ठेवली पाहिजे याची त्यांना कल्पना होती. या दृष्टीनेच अरबामधील इजिप्त व इराकसारखे त्यातल्या त्यात पुरोगामी देश त्यांनी जवळ केले. इंडोनेशियामध्ये सामंजस्य जुळविले व सर्वात महत्त्वाचे म्हणजे अफगाणिस्तानला सतत आपल्या बाजूला ठेवले. या कामी रशियाची मैत्री उपयोगी पडली.

अफगाणिस्तान आपल्या बाजूस राहिल्याने पाकिस्तान–इराण–सौदी अरब ही भारतविरोधी फळी उभी राहू शकत नव्हती. या परिस्थितीमध्ये इराण व इतर मुस्लिम राष्ट्रांमध्ये आलेला इस्लामी

पुनरुज्जीवनवाद व त्याच्या जोडीला असलेले तेलाचे हत्यार व प्रचंड सपत्ती याचा विचार करणे आवश्यक आहे

इराणमध्ये शहाविरुद्ध मिळालेल्या यशामुळे तेथील नेत्याना फाजील आत्मविश्वास वाटत असून इराणी नेते क्रांती निर्यात करण्याचा व पॅन हुल्लामिझमची कल्पना पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपले तत्त्वज्ञान व जीवनपद्धती सर्वश्रेष्ठ आहे व ती इतरापर्यंत पोहोचविणे आपले कर्तव्य आहे अशी या मंडळीची श्रद्धा आहे.

## 'इस्लामिक बॉम्ब'

पाकिस्तानमध्ये जनरल झियांसारखे इस्लामी पुनरुज्जीवनवादी लष्करी हुकूमशहा 'इस्लामी बॉम्ब' बनविण्याच्या व आधुनिक लष्कर उभारण्याच्या खटपटीत आहेत. पाकिस्तानचे तंत्रज्ञान व अरबी पेट्रोलचा पैसा अशी जोड तुडवून 'इस्लामी शक्ती' उभी करण्याचे प्रयत्न होत आहेत. ही इस्लामी शक्ती ऐतिहासिक व भौगोलिक कारणामुळे अमेरिका वा रशियापेक्षा इस्त्रायल व भारताविरुद्ध वापरली जाण्याचा धोका आतापर्यंत अधिक होता.

बांगला देशमधील पराभवानंतर पाकिस्तान हे अत्यंत दुखावलेले राष्ट्र असून त्या पराभवाचे उट्टे काढल्याशिवाय त्याला स्वस्थ बसवणार नाही. हे लक्षात ठेवावयास हवे. या परिस्थितीमध्ये अमेरिकन लष्करी मदतीने पाकिस्तानच्या भारतविरोधी प्रयत्नाना मदतच होणार असून अपेक्षेपेक्षा लवकर पाकिस्तान भारताविरुद्ध आक्रमक पवित्रा घेण्याचा धोका आहे.

तेलाचे हत्यार वापरून अरब राष्ट्रानी पाश्चात्य औद्योगिक राष्ट्राना वेठीला धरले आहेच. शहाना परत मिळविण्यासाठी ते तेलाचे हत्यार अप्रत्यक्षरीत्या वापरीत आहेत. तेलाच्या किमती वाढविणे व उत्पादन कमी करणे असे प्रयत्न करून ते आपली हेतुपूर्ती करून घेऊ इच्छितात.

अमेरिकन ओलिसाच्या प्रकरणाने सर्व सुसंस्कृत जगाला हादरा दिला आहे. अरबी आखातात नव्याने निर्माण होत असलेल्या एका नवीन 'जागतिक दुखण्याची' ती नादी आहे हे वेळीच लक्षात घेणे आवश्यक आहे. ओलीस प्रकरणामुळे व शहाच्या बाजूची म्हणून इराण व इतर मुस्लिम राष्ट्रामध्ये अमेरिका विरोधी कडवी तिरस्काराची भावना निर्माण झाली आहे. या वादामध्ये अमेरिकेची मित्र राष्ट्रेही पेट्रोल बंद होण्याच्या भीतीने कणखर भूमिका घेण्यास तयार नाहीत.

## इस्लाम विरुद्ध कम्युनिझम

या पार्श्वभूमीवर रशियाचा अफगाणिस्तानमधील लष्करी हस्तक्षेप पाहणे उचित ठरेल. इस्लामी तत्वज्ञान मूलत.च कम्युनिझमच्या धर्माबाबतच्या भूमिकेमुळे कम्युनिझमविरोधी आहे. इराण व इतर मुस्लिम राष्ट्रांमध्ये असलेल्या कम्युनिस्ट गटाना मुल्लामौलवीकडून कडवा विरोध होत असून तसेच चित्र अफगाणिस्तानमध्ये दिसत आहे. तराक्की व नतर अमीन याच्या राजवटीना विरोध करणाऱ्या 'मुजाहेदिन' व 'जमाते इस्लामी' या कडव्या धार्मिक संघटना असून त्याचे नेतृत्व मुल्लामौलवीकडे आहे. इराणचे नेते आयातुल्ला खोमेनी यांनीही रशियन हस्तक्षेपाबाबत केलेले विधानही महत्त्वाचे आहे. 'रशियाचे आक्रमण हे सर्व मुस्लिम जगतावरचे आक्रमण आहे' असे ते म्हणाले. यावरून अफगाणिस्तानातील कम्युनिस्ट सरकार आणि रशिया याना धार्मिक गटातर्फे कडवा विरोध होत राहील व त्यांना इस्लामी जगताचे साहाय्य लाभेल असे दिसते. अफगाण लोक अतिशय कडवे लढवय्ये असून स्वातंत्र्यप्रेमी आहेत असे इतिहास सांगतो.

मुस्लिम राष्ट्रांजवळ तेलामुळे भरपूर सपत्ती असून अफगाणिस्तानातील लढा चालविण्यासाठी त्याना परकीय आर्थिक मदतीची आवश्यकता नाही. लढ्यासाठी लागणारी हत्यारे ते जागतिक बाजारात विकत घेऊ शकतात.

या पार्श्वभूमीवर अमेरिकेने पाकिस्तानला घाईघाईने अत्याधुनिक हत्यारे देण्याची गरज आहे असे वाटत नाही. अमेरिकनानी जगभर कम्युनिस्टाना रोखताना नेहमीच मुत्सद्देगिरीचा अभाव व स्थानिक लोकाच्या इच्छा-आकांक्षाचे अज्ञान दाखविले आहे. अरबाचा पैसा व कडवे अफगाण लढवय्ये हे अफगाणिस्तानातील अतर्गत युद्ध लढू शकतात.

अफगाण निर्वासितांना व अफगाण सरकारविरुद्ध लढणाऱ्या संघटनाना आपल्या प्रदेशात पाकिस्तानने आश्रय दिला नाही वा मदत केली नाही, तर अफगाणिस्तानातील आपल्या प्रभावाखालील सत्ता टिकविण्यापलीकडे रशिया हालचाली करील असे वाटत नाही.

'इराण, पाकिस्तान व भारत याच्याशी आपल्याला चांगले सबंध ठेवायचे आहेत' असे सत्तेवर आल्याबरोबर नवीन अध्यक्ष बाबांक कार्मेल यांनी जाहीर केले आहे, हे महत्त्वाचे आहे.

मुस्लिम राष्ट्रामध्ये उसळलेल्या अमेरिका विरोधी लाटेला परतविण्याची चागली सधी अमेरिकेला उपलब्ध झाली आहे. मुस्लिम राष्ट्रे रशियाविरोधी लढ्यात गुतल्यास त्याची हत्याराची गरज वाढेल व हत्याराच्या मोबदल्यात तेलाबाबत सवलती औद्योगिक राष्ट्राना मिळवता येतील.

कम्युनिस्टविरोधी लढ्यामध्ये मुस्लिम राष्ट्राना कदाचित भारताची सहानुभूती मिळविण्याचीही गरज भासेल. इस्लामी पुनरुज्जीवनवादी शक्ती या लढ्यात गुतून राहिल्यास भारताला ते उपकारकच ठरेल. भारतीय राज्यकर्त्यांना अफगाणिस्तानमधील नव्या घडामोडीबाबत आपले धोरण ठरविताना वरील गोष्टी नजरेआड करता येणार नाहीत.

□

निवडणुका येतील आणि जातील. नेहमी करावयाचे काम कोणते ? ते कसे उभे करावे ? याचा हा एक नमुना. असे नमुने सध्या थोडेच आहेत, यांची संख्या वाढली आणि आहेत ती अशी कामे अधिक मजबूत झाली तरच लोकशाही चिरस्थायी होईल. लोकशाहीवाद्यांनी हताश न होता अशा कुठल्या न् कुठल्या मूलभूत स्वरूपाच्या कामाशी आपला संबंध जोडला पाहिजे.

# लोकशाहीची पाळेमुळे अशी जोपासावी लागतात

## ग्राम स्वराज्य समिती, शहादे : वार्षिक आढावा ( १९७८–७९ )

सातपुड्याच्या पायथ्याशी राहाणाऱ्या आदिवासीमध्ये व इतर कष्टकरी गरीब जनतेमध्ये संघटना करून, त्याच्याच शक्तीने ते आपल्यावर होणारे अन्याय, अत्याचार दूर करू शकतात हे त्याना ग्रामस्वराज्य समिती या लोकसंघटनेने दाखवून दिले आहे. गेली ६ वर्ष ग्रामस्वराज्य' समिती अव्याहतपणे त्या भागात काम करीत आहे. केवळ शहाद्यातच नव्हे तर तळोदा, अक्कलकुवा व आता सिंदखेडा, शिरपूर, धडगाव तालुक्यात काम पसरले आहे. शहादे भागातील आदिवासी, भिल्ल तरुणानी ग्रामस्वराज्य समितीच्या कामाची उभारणी केली. कै० अंबरसिंग यानी सर्वोदय चळवळीतून सामाजिक दृष्टी घेऊन संघटना उभी केली व नंतर आपल्या स्वतंत्र प्रतिभेने लोकाची चळवळ चालवली.

या भागात गरिबाचे शोषण, त्याची पिळवणूक अनेक प्रकारांनी होत होती. त्याच्या जमिनी बेकायदेशीरपणे सावकार व जमीनदारानी हडप केल्या होत्या. त्यामुळे ते सर्व लोक शेतमजूर बनले होते. त्याना मजुरी फारच कमी म्हणज बारा आणे त्यावेळी मिळत होती. सरकारी अधिकारी व पोलीस त्याना हवे तसे छळत व लुबाडत होते. पीक सरंक्षण सोसायटयाचा जुलूम चालला होता. जगल अधिकारी त्रास देत होते. आता हे गरीब संघटित झाल्यामुळे या सर्वच प्रकाराना आळा बसला आहे. बेकायदेशीरपणे गेलेल्या जमिनी आदिवासीनी परत मिळविल्या आहेत. अशी सुमारे दहा हजार एकरावर जमीन आदिवासीनी परत मिळविला. ज्या जमिनी कायदेशीर व्यवहारापोटी गेल्या होत्या त्या परत मिळण्यासाठी महाराष्ट्र सरकारला कायदा करावा लागला. त्यामुळे आता त्या भागामध्ये बहुतेकाना जमिनी परत मिळाल्या आहत. दुर्दैवाने अबरसिंग याचे किडनीच्या विकाराने अकाली निधन झाले. त्याच्या मागे त्याचे तरुण सहकारी व त्यांच्या पत्नी छायाताई ही चळवळ पुढे चालवत आहेत. शोषणमुक्त समतानिष्ठ समाज निर्माण करण्याचे दृष्टीने वाटचाल सुरू आहे. संपूर्ण क्रांतीचे ध्येय डोळयापुढे ठेवून चळवळ वाटचाल करीत आहे. या भागात चळवळ चाललेली असूनही जोपर्यंत संघर्षात्मक कार्यक्रम हाती घेतला जात नाही तोपर्यंत शासनाचे लक्ष तेथल्या प्रश्नाकडे जात नाही. त्यामुळे सतत झगडत रहावे लागते. या झगडण्यातून जंगल अधिकारी जी वेठबिगारी करीत होते ती बंद करण्यात आली. जंगल अधिकाऱ्याच्या चाललेल्या अफाट भ्रष्टाचाराला वाचा फोडण्यात आली.

या वर्षी धडगांव भागातील तोरणमाळ भागात काम सुरू झाले. तेथे कार्यकर्ते हिंडत असताना जंगल अधिकाऱ्याच्या भ्रष्टाचाराच्या अनेक कथा गावोगावी पहायला मिळाल्या. हा भाग सातपुड्याच्या दुर्गम भागात आहे. रस्ता नाही, त्यामुळे जगाशी संबंध नसलेला असा हा भाग आहे. दवाखाना नाही, शाळा नाही अशी या भागातली स्थिती आहे. त्यामुळे त्याचे बरेचसे जीवन स्वावलंबी आहे. सिंधी नावाच्या एका गावातून २४ भूमिहीनाना जमीन देतो असे सांगून वनखात्याच्या कर्मचाऱ्याने प्रत्येकाकडून ५५०/– रुपये घेतले होते. त्याना जमिनीही दिल्या नाहीत व त्याने पैसेही परत केले नव्हते. लोकानी ग्रामस्वराज्य समितीकडे तक्रार केली. त्यावेळी त्याना संघटित व्हायला पाहिजे व आपल्या पैशाची मागणी केली पाहिजे असे सांगण्यात आले. आदिवासी लोक वाघाला घाबरत नाहीत परंतु जंगल अधिकाऱ्यांना घाबरतात. त्यामुळे जंगल अधिकाऱ्याचे अत्याचार ते निमूटपण सहन करतात. सिंधी गावच्या लोकानी आपली एकी केली व तीस मैल चालत जाऊन जंगल अधिकाऱ्यांच्या कचेरीला घेराव घातला. लोकाचे हे रूप पाहून अधिकारी नमले. आपली बेअब्रू व्हायला नको म्हणून लोकाचे पैसे परत करायचे त्यानी लेखी लिहून दिले व ठरलेल्या मुदतीत चार हप्त्यात लोकाचे पैसे परत केले. लोकाचा विजय झाल्यामुळे त्या भागात कामाला चागली चालना मिळाली व अनेक गावचे लोक आपापले पैसे परत मागू लागले. जंगल अधिकाऱ्यावरही परिणाम झाला व त्याच्या भ्रष्टाचाराला आळा बसला.

जगल जमीन जी वर्षानुवर्षे लोक कसत आहेत तो त्या भूमिहीनाना मिळावी असा आग्रह ग्रामस्वराज्य समितीने पहिल्यापासून धरलेला होता. अनेक वेळा त्यासाठी सत्याग्रह केलेला आहे व लोक तुरुगात गेलेले आहेत. यावर्षी आपल्या जमिनी ताब्यात ठेवायच्या, जमिनीची

लागवड करायची असे लोकांनी ठरवून त्याप्रमाणे जमिनी कसल्या. चिरडे या गावी जंगल जमिनी वाटपात अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला व ज्यांच्याकडे जमिनी होत्या अशाच लोकांना ही जमीन वाटून टाकली. त्याबाबत संघर्ष निर्माण झाला. कारण जे भूमिहीन कसत होते, त्यांना न देता जमीन असणाऱ्या लोकांनाच शासनाच्या अधिकाऱ्यांनी जमीन दिली. आपण कसत असलेल्या जमिनी सोडायच्या नाहीत असा निर्णय लोकांनी घेतला. सध्या केस कोर्टामध्ये गेली आहे. नवीन झालेले वाटप रद्द करण्याचा प्रयत्न होत आहे.

शहादे तालुक्यात सिलिंगमध्ये येणारी जमीन अजून वाटली नाही. चिखलीला एका मालकाकडे सातशे एकर जमीन आहे. ती निरनिराळ्या लोकांच्या नावावर ठेवण्यात आली आहे. काही लोक मयत झाले आहेत, त्याना वारसा नाही. आता ती जमीन सिलिंगमध्ये काढण्यात आली पाहिजे यासंबंधी त्या भागातील लोकांनी शासनाकडे निवेदन केलेले आहे व ग्रामस्वराज्य समितीनेही शासनाला कळवून दिले आहे की, शासनाने लवकर ती जमीन वाटली नाही तर गावोगावचे लोक सत्याग्रह करतील व जमीन वाटप करून घेतील. त्या भागातील पाटीलवाडीची जमीन वाटत नाहीत म्हणून लोकांनी सत्याग्रह केलेला आहे. आता मालक सुप्रीम कोर्टात गेलेले आहेत.

शेतमजुराचे किमान वेतन ठरले आहे. परंतु अनेक गावांतून ते दिले जात नाही. विशेषतः बायांना कमी मजुरी मिळते. कायद्यामध्ये स्त्री-पुरुषांना समान वेतनाची तरतूद आहे परंतु ती दिली जात नाही. अशा काही निवडक गावांमध्ये लोक संघटित होऊन लोकसमित्यांमार्फत त्यांनी आपल्या मजुरीतील फरक मागितला. काही सालदारांनाही कमी वेतन दिले जात होते. सालदार व शेतमजुराना मजुरीतील फरक होता तो मिळावा यासाठी गावामध्ये सभा, मोर्चा, बैठका घेण्यात आल्या. देवूर, बोराळी, माटकूट, कुकावल, कोठली, कहाटूळ आदी गावांतील लोकांनी हा फरक मिळविला. देवूर गावात त्यासाठी संघर्ष झाला. कारण तेथील जमीनदारांनी मजुरीतील फरक द्यायला टाळाटाळ केली. म्हणून आदिवासींनी संप सुरू केला. मोर्चा, संप सुरू झाले. जमीन मालकांनी मजुरांना काम द्यायचे नाही असा ठराव केला व काढून टाकले. गरिबांचे पाणी बंद केले. दुकानातून माल मिळेनासा झाला. संप मोडून टाकण्याचा प्रयत्न पोलिस यंत्रणेला हाताशी धरून करण्यात आला. पोलिस अधिकाऱ्यानी जमीनदाराची बाजू घेतली. त्यावेळी छायाताईंना उपवासाचा निर्णय घ्यावा लागला. चार दिवस शहादा तहसील कचेरीवर उपवास केल्यानंतर त्या गावातील प्रश्न सुटला व मजुरीतील फरक मिळाला. अरेरावीने वागणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांची बदली करण्याचा निर्णय शासनाने घेतला. महाराष्ट्राचे गृहराज्य मंत्री त्या भागात दौऱ्यावर आले असताना देवूर गावाला त्यानी भेट दिली.

सिंदखेडे तालुक्यात या वर्षी नवीन कामाला सुरुवात झाली. त्या भागात सरंजामशाही पद्धती अजून चालू आहे. त्याखाली दबलेले गरीब लोक आता संघटित होऊ लागले आहेत व आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचा जाब विचारू लागले आहेत. त्या भागातील अमळथे या छोटयाशा गावी दलित, आदिवासी, गरीब भूमिहीन लोकांनी गावच्या गुरचरण जमिनीमध्ये शेती केली होती. तिचा नाश गावच्या धनिकानी केला. चागले भरघोस पीक येणार होते. त्या शेतीमध्ये गावच्या धनिकांनी जनावरे घातली व सर्व शेतीचा नाश केला. गरीब पोलिसांकडे गेले, जिल्हाधिकाऱ्यांकडे गेले, परंतु त्याना कुणी दाद दिली नाही. शेवटी ते ग्रामस्वराज्य समितीकडे आले. ग्रामस्वराज्य समितीच्या कार्यकर्त्यांनी झालेल्या नुकसानीची पाहणी केली. सर्व परिस्थिती समजून घेतली व गरीब लोकाना संघटित व्हायला सांगितले. नुकसान भरपाई आम्ही देणार नाही असे म्हणणाऱ्या लोकांना गरिबांच्या संघटित शक्तीपुढे मान तुकवावी लागली व नुकसानभरपाई त्यानी देण्याचे मान्य केले. सरकारच्या नवीन धोरणाप्रमाणे जमिनी लोकाना मिळाल्या पाहिजेत असा आग्रह लोकानी धरला. तेही मान्य करण्यात आले. पाच महिने ते लोक लढत होते. शेवटी प्रत्येकी तीन एकराप्रमाणे जमीन दिली. लोक शेतीच्या कामाला लागले आहेत गावात आलेल्या प्रांत ऑफिसरला तेथील लोकांनी घेराव करून आम्हाला धान्य मिळवून द्या असा आग्रह धरला. अधिकाऱ्यांनी धान्य देण्याचे मान्य केले व दोन दिवसांनी गरिबाना धान्य मिळाले. आपण संघटित झालो तर आपले प्रश्न आपण सोडवू शकतो हे अमळथ्याच्या लोकांनी दाखवून दिले व त्या भागातील सर्व गरीब लोकांना त्याचे उदाहरण मिळाले. त्यामुळे गावागावात वातावरण बनले. कुणी आपल्या जमिनी सोडवून घेण्याचा प्रयत्न करू लागले, कुणी आपला मजुरीतील फरक पाहिजे म्हणून आवाज उठविला. याप्रमाणे त्या भागातील लोकांना आपल्या जमिनी परत मिळू लागल्या आहेत. जमिनीचे वाटप चुकीचे झालेले आहे ते रद्द करून घेण्यासाठी गावकरी चळवळ करू लागले आहेत.

शहादे शहर आता मोठे वाढत आहे. त्या शहरामध्ये झोपडपट्ट्या बऱ्याच आहेत. भिलाटीत जी झोपडपट्टी आहे तेथे पिण्याच्या पाण्याची सोय पुरेशी नव्हती त्या भागातील हजार गरीब महिलानी कडेवर घागरी घेऊन नगरपालिकेवर मोठा मोर्चा नेला. नगरपालिकेने त्यानंतर पिण्याच्या पाण्याची सोय करून दिली. दरवर्षी शेतमजुरांचा एक मेळावा होत असतो. यावर्षी मेळावा कुकावल या गावी घेण्यात आला. त्या मेळाव्याला सुप्रसिद्ध समाज सेवक, खादी ग्रामोद्योग मडळाचे अध्यक्ष श्री. शिरुभाऊ लिमये उपस्थित होते. मेळाव्याला शहादा, शिरपूर, शिंदखेडा व तळोदा तालुक्यातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपण अडाणी राहिलो त्यामुळे आपली फसवणूक होत राहिली याची जाण आता गावोगावच्या लोकांना झाली आहे. म्हणून आपण शिकले पाहिजे असे त्याना वाटू लागले आहे. भारतसरकारच्या प्रौढ शिक्षण योजनेच्या सहकार्याने गावागावात प्रौढ शिक्षणाचे काम सुरू करण्यात आले. जेथे जाणीव जागृती चांगली होती, लोकांची मागणी होती, उत्साह होता अशा ठिकाणी हे प्रौढ वर्ग सुरू करण्यात आले. त्या त्या गावच्या तरुणांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली. या प्रौढ शिक्षण योजनेचे उद्घाटन ६ ऑक्टोबर १९७८ रोजी महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री प्रा. सदानंद वर्दे यानी केले. त्या निमित्ताने वडाळी या गावी मोठा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यानंतर एक प्रौढ शिक्षण संघटकाचे शिबीर तीन दिवसाचे तेथेच घेण्यात आले. सत्तर तरुण शिबिरात सामील झाले होते. या प्रौढ शिक्षण योजनेच्या मंजुरीचे काम सोसायटी फॉर डेव्हलपिंग ग्रामदान या सबंध देशात काम करणाऱ्या संस्थेने घेतले. त्यांच्या मार्फतच हे वर्ग चालविण्यात आले. प्रथम या वर्गाचा उत्साह चांगला होता. पुढे या कामामध्ये शिथिलपणा आला, परंतु दहा महिन्याचा अभ्यासक्रम सर्वत्र पुरा करण्याचा प्रयत्न होत आहे. या वर्गाच्या मार्फत रोज हजार लोक संपर्कात येत आहेत व त्याचेच प्रश्न घेऊन त्यांच्यात जागृती कशी निर्माण होईल या दृष्टीने प्रयत्न केला जात आहे प्रौढ वर्गामुळे भजनाचा कार्यक्रम अधिक संघटित होऊ लागला.

आपल्या दैनंदिन प्रश्नावाबत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे शैक्षणिक, सामाजिक शिक्षण होण्याची नेहमी आवश्यकता भासते. बहुतेक

कार्यकर्ते शेतमजुरात काम करणारे आहेत. काही स्वत: शेतमजूर आहेत. ते आपले मजुरीचे काम करून आपल्या व आसपासच्या गावात काम करतात. अशा लोकाची शिबिरे नेहमी घेण्याचा प्रयत्न केला जातो. या शिबिरातून त्याचे प्रश्न ते कसे सोडवतील या दृष्टीने प्रयत्न केला जातो. एक पूर्ण वेळ कार्यकर्त्यांचे शिबिर पिंपळोदे या गावी झाले त्यात प्रा. नलिनीताई पंडित, लताताई पाटणकर, वसंतराव पळशीकर यानी मार्गदर्शन केले. या शिबिराला जोडून महिलाचे शिबिरही दोन दिवसाचे घेण्यात आले. स्थानिक कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण व्हावे, त्यांच्यातीलच तरुण मंडळीनी कामाची जबाबदारी घ्यावी असे पहिल्यापासून धोरण ठेवण्यात आले. अनेक गावचे लोक आमच्या गावात कार्यकर्ता द्या अशी मागणी करीत असतात. त्याना सागितले जाते की, तुमच्या गावचा तरुण द्या, त्याला आम्ही तयार करून तुमच्या गावात परत पाठवतो. या वर्षी अशा दहा तरुणांना तयार करण्याचा प्रयत्न झाला. त्यातील सन्याभाऊ, ज्युलिअस अतू, भीमराव, खेत्या, अधिकार हे तरूण तयार झाले व ते क्षेत्रामध्ये काम करू लागले आहेत सन्या भिल सुलवाडे गावचा, दोन वर्षापूर्वी त्याने गावच्या शेतमजुराना संघटित केले. मजुरी वाढवून घेण्यासाठी संप करावा लागला. तो चागला यशस्वी झाला. परंतु सन्याने त्या गावचे पुढारीपण केल्यामुळे त्याला कुणी काम दिले नाही. त्यामुळे काम शोधायला त्याला कुकावलला जावे लागले. त्याच्या कुटुबात अठरा एकर जमीन असून त्याला सालदारी करावी लागते. शेती करायला पाहिजे. परंतु साधने नाहीत, बैलजोडी नाही, पोट हातावर असते. कुटुबात माणसे खूप. तो कुकावलला सालदारी करायला लागला तर तेथेही त्याने शेतमजुराना संघटित केले व मजुरीतील फरक मिळविला. तो आता परत आपल्या गावी आला आहे व पूर्ण वेळ कार्यकर्ता बनला आहे. त्याने दोन चोरांना पकडून दिलं. पूर्ण वेळ कार्यकर्त्यासाठी नावाने घर द्यावे, त्याला लागेल तेवढे धान्य द्यावे. ग्रामस्वराज्य समितीने त्याच्या खर्चासाठी पन्नास रुपये द्यावेत अशा प्रकारची योजना ठरविण्यात आली आहे. असे हे सर्व तरुण आता काम करू लागले आहेत.

शहाद्याला मुख्य ऑफिसर सातपुडा सर्वोदय मंडळाच्या इमारतीत होते. ज्या घरी ऑफिस होते ते घर सोडावे लागले. त्यामुळे भिलाटीत एक नवीन घर उभे करावे लागले. त्यात कार्यकर्त्यांचा बराच वेळ गेला

कार्यकर्त्यांना सतत कामात रहावे लागते. कुणाच्या मजुरीचा प्रश्न, कुणाच्या रोजगारीचा प्रश्न, आपापसातील भांडणाची प्रकरणे, अन्याय अत्याचाराची प्रकरणे—अनेक लोक या कामासाठी येत असतात व ही लोकाची कामे ग्रामस्वराज्य समितीच्या वतीने शेवटपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला जातो. सरकारी अधिकाऱ्यांनी घेतलेले पैसे लोकांना परत मिळवून देण्यात आले आहेत. आपापसातील भाडणे गावपातळीवर सोडवायचा सतत प्रयत्न होत असतो. जमिनीच्या केसेस ट्रिब्युनल व हायकोर्टामध्ये पडून आहेत. त्यासाठी प्रयत्न करावा लागतो.

महाराष्ट्रात रोजगार हमीचा कायदा आहे मागेल त्याला काम देण्याचे महाराष्ट्र सरकारने मान्य केले आहे व मजुराला किमान तीन रुपये व एक किलो गहू द्यायला सुरुवात झाली आहे. रोजगार हमीची कामे जास्तीत जास्त निघतील असा सतत प्रयत्न चाललेला आहे. त्या भागात अनेक अडचणी येतात. तो एक स्वतंत्र प्रश्न आहे. तो प्रश्न सोडवण्याचा कार्यकर्ते प्रयत्न करतात. वेळेवर पगार होत नाहीत, तो मिळेल असा प्रयत्न करायचा, खोटी हजेरी लावली जाते. मापे नीट घेतली जात नाहीत. लोकाना सर्व परिस्थिती समजू शकेल असे प्रयत्न केले जातात.

संघर्षाबरोबरच रचनेचे काम करावे असे अनेकाना वाटते; परंतु संघर्षाचेच काम एवढे रहाते की या रचनेच्या कामाकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. तरी या वर्षी तीन गावातून त्या कामाची सुरुवात करण्यात आली आहे. या भागातील आदिवासीकडे जमिनी आहेत; परंतु अवजारे नाहीत, म्हणून तीन गावामध्ये पंचेचाळीस बैलजोड्या ग्रामस्वराज्य समितीने गावच्या लोकसमितीमार्फत दिल्या आहेत. या गावाचे काम हळूहळू वाढावे व लोकाची संघटना पुढे जावी व आदिवासी उपयोजना व इतर योजनांच्या सहकार्याने अधिकाधिक गरीब लोकाना साधने मिळवून देण्याचा प्रयत्न चाललेला आहे. प्रौढ शिक्षण वर्ग चाललेले आहेत; दहा ठिकाणी संपर्क वाचनालये सुरू करण्यात आली आहेत. या रचनेच्या कामात विशेष लक्ष देता येत नाही याची सतत जाणीव आहे; परंतु हे काम कुणी करत असेल तर ते करावे असाही प्रयत्न चाललेला असतो. गावात मुले भटकत असतात. त्याच्यासाठी बालवाडी चालवावी असे वाटते. हे काम युप्रसतर्फे या भागात सुरू करण्यात आले आहे. पंचवीस ठिकाणी बालवाड्या सुरू केल्या आहेत. त्याबरोबर औषधोपचारे व तरुणासाठी प्ले सेंटर युप्रस चालविते, काही गावाची पाहणी करून त्याची योजना बनवायचे कामही सुरू आहे. वर्ध्यांच्या रीजनल प्लॅनिंग इन्स्टिटयूटतर्फे हे काम होत आहे. ग्रामीण तरुणात व्यापक जाणीव जागृती व्हावी म्हणून नुकतेच एक शिबिर पंधरा दिवसाचे *लोणावळा येथे घेण्यात आले* त्या शिबिराचे संचालन श्री. वसंतराव पळशीकर यांनी केले. शहादे भागात अशी छोटी छोटी शिबिरे श्री. वसंतराव पळशीकर यांच्या बरोबर घेण्यात आली. त्यामुळे स्थानिक कार्यकर्ते अधिकाधिक बोलू लागले आहेत. चर्चा करू लागले आहेत, लोणावळयाला शिबिराला शहाद्याहून सतरा लोक गेले होते.

धुळे, ठाणे याप्रमाणे चंद्रपूर, अमरावती, अकोला, वर्धा, भंडारा या जिल्ह्यातले स्थानिक कार्यकर्ते आपापले सघन क्षेत्र बनवून काम करीत आहेत. सघन क्षेत्रे वाढली तर ठिकठिकाणी गरीब लोक संघटित होऊ शकतील व स्वत:च्या संघटनेच्या बळावर आपल्या अडचणी दूर करू शकतील, हे सर्व करायचे तर अनेकाचे सहकार्य घ्यावे लागते. शहादे भागातील आंदोलनाच्या कामाचा चाळीस हजार रुपयाचा वर्षाचा खर्च आहे. स्थानिक धान्य रूपाने मदत मिळवण्याचा प्रयत्न होतो. धुळे व जळगाव येथील मंडळी या कामाला मदत करतात. मुंबई, पुण्याची मंडळीही आपुलकीने मदत करतात, त्यामुळे येथील कार्यकर्ते निश्चितपणे काम करू शकतात. यावेळी श्री. वसंतराव पळशीकर यांनी शिबिराची जबाबदारी सांभाळली व नवीन कार्यकर्त्यासाठी जो खर्च येईल त्यासाठी आर्थिक मदतही जमवून दिली. मुंबईचे प्रभुभाई संघवी व त्याची मित्रमंडळी खूपच मदत करतात. मंडलीक स्मारक ट्रस्ट एका कार्यकर्त्याचा खर्च देतात. काम वाढवायचे तर कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे. कार्यकर्ते कामाला लागायचे तर खर्च वाढतो. त्यामुळे कामाला मर्यादा येतात. म्हणून अनेकाचे सहकार्य अजूनही मिळायला पाहिजे आहे.

☐

पुस्तके

# दुसरं आकाश

## आत्मलक्षी कविता

मराठी साहित्यक्षेत्रात अलीकडील काळात कवितांचे पेव फुटले आहे. कविता हा प्रांत जरी सान्याना जवळचा वाटत असला तरीही कविता ही खरं तर सर्वांसाठी नसतेच. कविता श्राव्य आणि दृश्य असते. श्राव्य कविता दृश्य असतेच असं नाही. या संदर्भात श्री. र. कृ. जोशी यांची कविता विचारात घेण्याजोगी आहे. ही कविता दृश्य आहे, श्राव्यही आहे. पण तरीही एक गोष्ट उरतेच. कवितेतली काव्यात्मकता. हे काव्यपण, काव्यात्मकता त्या कवितेच्या शब्दाशब्दातून, पोकळीतून, रचनेतून वाहत असते. काव्यात्मकता हा कवितेचा एक महत्त्वाचा विशेष मानला जातो तो याचमुळे. कविता वाचून झाली, ऐकून झाली तरी जे उरतं ते काव्य. हे काव्य तुम्हा आम्हाला भावतं.

अशी कविता मराठीत फार थोडी. जी आहे ती आपल्या गुणानी तळपते आहे याची जाणीव मराठी साहित्य रसिकांना आहेच. या कवितातून जो संपूर्णतेचा, संपन्नतेचा अनुभव मिळतो तसाच काहीसा अनुभव हेमा लेले *यांच्या* '*दुसरं आकाश*' *या* कवितासंग्रहातील कवितामधून आपणाला भेटायला येतो.

'दुसरं आकाश' हा हेमा लेले यांचा पहिला वहिला कविता सग्रह. पहिला वहिला असला तरीही कवितामधील अनुभव शैली संपूर्णतः वेगळी, निराळी नाही आणि तरीही ही कविता आपलं स्वत.चं खास अस्तित्व लक्षात आणून देते. संग्रहाच्या मुखपृष्ठावर एक झाकाळलेलं आकाश. 'दुसर आकाश' या नावामागे असलेली आशयानुरूपता दाखवणारं आकाश हे आकाश अपुर पडतं म्हणून की काय या दुसऱ्या आकाशाची ही कल्पना. हे अनुभव तोकडे, अपुरे वाटतात म्हणूनच नव्या अनुभवांच्या शोधात ही कविता दुसऱ्या आकाशाच्या शोधात बाहेर पडते.

हेमा लेले यांची ही कविता बरीचशी आत्मलक्षी आहे कवितेला अनुभव, आशय, आत्मलक्षित्वाची जाणीव करून देतो. आपण आपणालाच किती ओळखावं याची उत्तरं शोधण्याचा हा एक लक्षणीय प्रयत्न.

नसतील फुटत पंख हव्या त्याच घरट्यात
मिटण्यासाठी,
तर उडू नये
नि
नसेल हवं तेच सागता येत शब्दाना,
तर बोलू नये

ही या कवितेमागची प्रेरणा आहे शब्दांच्या माध्यमातून हव तेच सागण्याची ही धडपड.

कविता आपल्या वाटा शोधत असते. आपला आशय, अनुभव अभिव्यक्त करण्यासाठी वेगवेगळया शैलीचा वापर करीत असते. ही शैली त्या अनुभवाच्या मुशीतूनच साकार होत असते. या शैलीतच खरं तर काव्यातली काव्यात्मकता दडलेली असते.

'पक्षाचा ठाव, मनचा गाव
कुठे शोधावा ? कुणी शोधावा ?
दिसात झुरलं, रातीनं भरलं
बघून बघून भान हरपलं...

किंवा

'एकदा वाटल की वाटत राहतं
आली पौर्णिमा की हेलावून जातं–
–एकदा हेलावलं की घडत राहतं
झाली सळसळ की गुतत जातं
–गुतलं गेलं की अनिवार होतं
झालं अनिवार की जगून जातं
एकदा जगलं की जगून राहतं...'

यासारखे वेगवेगळे आकृतिबंध ही कविता अनुभवानुरूप शोधत असते. यातच या कवितेचं काव्य लपलेलं आहे.

ही शैली मुक्त छंदापासून मुक्त काव्यापर्यंत सर्व आकृतिबंधात दिसून येते. एखादी कविता

'मागील ते देशील का ?
विचारीन ते सांगशील का ?
गवतफूल डोलत का ?
गंधवेडा वारा का ?'

असे प्रश्नच विचारीत राहते. तर एखादी कविता, 'चिमण्या पंखात भिरभिरली सावळी संध्याकाळ, तेजाळ ज्योतीत सरसरली उगवती कंच रात' यासारखा वेगळा अनुभव कथन करते.

ही कविता कवयित्रीच्या वेगवेगळया भावावस्था दर्शविते अगदी मनाच्या तळातील अनुभव ती ज्याप्रमाणे व्यक्त करते त्याचप्रमाणे संवेदनाशील भावनाही व्यक्त करते. कुठेही आक्रस्ताळेपणा नसलेली, ही कविता आपल्या भावविश्वाचा शोध संवेदनाशील ठामपणात आणि स्वयंनिर्णयात घेताना दिसते

'प्रेमातली भावुकता एकदा उमलल्या स्वप्नानं जागवलं.

पकडायला जावं नि फुलपाखरानं
फक्त पंखाचा परागी रंग द्यावा तसं...

किंवा

'नको राहूस रे आता असा दूर नि अस्पर्श
माझ्या समोरची वाट बघ सपते तुझ्यात'
यासारख्या कवितेत दिसून येते.

या कवितेतील प्रतिमाचा विचार केला तर मात्र त्याबाबत काही फार वेगळे, निराळे शक्य झालेले नाही· याचा अर्थ कवयित्रीच्या असर्जनशीलेत नाही, उलट त्याच प्रतिमा पुन्हा सर्जनशीलतेतून कवितेद्वारा साकार होताना दिसतात.

या कवितांना शीर्षके आहेत. कवितांना शीर्षके असावीत का ? सारी कविता हीच मुळी इतकी बांधीव असते की त्या बांधीवपणातून आणखी एक साराश काढणारे शीर्षक कवितेच्या शिरावर हवेच कशाला ?

कविता वाचताना त्यातील दृश्यभागही तेवढाच महत्त्वाचा मानला पाहिजे. ज्या पद्धतीनं ग्रॅफॉलॉजिकली ती माडली जाते, त्या पद्धतीतही एक शैली साकार होत असते.

दुसरं आकाशमधील शेवटची कविता या काव्य प्रवासाबद्दल म्हणते–

'कुठवर कळेल ? सारं कसं मिळेल ?
उत्तर नसलेला आंधळा प्रवास
माडलेलं घर नि मोडलेल्या वाटा
कुणावर आहे माझा हक्क कसा ?
कोणतीच साक्ष निर्णय देईना
जगण्याची आलेली खरी जागही सपेना !'

ही कविता अशीच हे प्रश्न घेऊन त्याच्या उत्तरात शोधत राहणार आहे. त्यातून नवे प्रश्न उद्भवतील, काही प्रश्नाची उत्तरं मिळतील. पण सर्जनशीलतेला ते एक आव्हानच असते.

–मुकुंद संगोराम

दुसरं आकाश (कविता संग्रह)
हेमा लेले
नीलकंठ प्रकाशन
पृष्ठे : ९८, मूल्य : पाच रुपये.

फिनिक्स निवड

# Criminal Violence Criminal Justice

–Charles & Silberman

आम्ही आमच्या ग्रंथालयात इंग्रजीमध्ये 'बुक-डायजेस्ट' नावाचे एक नियतकालिक सुरू केले आहे. चांगल्या चांगल्या इंग्रजी नियतकालिकांतून या मासिकाच्या जाहिराती देऊन सुमारे दिडेक वर्षापूर्वी ते भारतात 'लॉंच' केले गेले. द कोनीशूर, जहांगीर आर्ट गॅलरी, मुंबई हे त्याचे वितरक बनले. तीन वर्षांच्या वर्गणीबरोबर एक कॅलक्युलेटर मोफत देण्याचे वितरकांनी जाहीर केले.

मी तीन वर्षांची सुमारे ३७५ रु. वर्गणी भरल्यानंतर मला जे दहा-अकरा अंक आले ते खरंच सुरेख होते. एकीकडे कागदाची टंचाई वाढतच आहे. पण इंग्रजी पुस्तकांची पृष्ठसंख्याही त्याबरोबर वाढत आहे. जेम्स मिचनरच्या एका पुस्तकासाठी तर लगदा करायला कित्येक जंगले तोडावी लागली होती असे मी एकदा वाचले होते. तर ज्याना ठोकळे वाचण्याची अॅलर्जी आहे त्याना हे बुक-डायजेस्ट निश्चितच आवडेल. ८०० पानांच्या ग्रंथाचे ८ पानात reduction ad absurdum करण्यात असल्या नियतकालिकाना काहीच वाटणार नाही. बरे या डायजेस्टमध्ये लेखकाचे रंगीत फोटो, त्याचे कौटुंबिक जीवन व इतर माहितीही भरपूर असते. या बुक-डायजेस्टचे संपादक आहेत मार्टिन ग्रोस

मला एकाच गोष्टीची खंत वाटते की आमच्या ग्रंथालयात या मासिकाचे अकरा अंक आल्यानंतर अंक एकदमच बंद पडला. कॅलक्युलेटर मिळण्याचे तर राहोच, (नाहीतरी ग्रंथालयाला कॅलक्युलेटर घेण्याइतका प्रॉफीट कधी होतो?) पण रोज पोस्टमन आज अंक टाकेल, उद्या टाकेल अशी प्रतीक्षा केल्यानंतर दहा महिन्यानंतर जानेवारी १९७९ चा अंक परवा आला. अंक न मिळणे, कॅलक्युलेटर न पाठवणे हे दोष कदाचित वितरकाचे असतील.

वरील पुस्तकाचे संक्षेपीकरण यांच अंकात आले आहे. काही वेळा पुस्तकाचा परिचय देताना संक्षेपीकरणावरून काय किंवा त्या त्या ग्रंथातून काय, मी फक्त तेवढ्याच कक्षेतून लिहीत नसतो. तर त्यात माझे स्वतःचे असे काही, कात्रणातील काही, संदर्भग्रंथातून काही घेऊन लिहीत असतो.

हिंसा हा विषय इतका गुंतागुंतीचा व गहन आहे की त्यावर हजार पानाचा ग्रंथ लिहिला तरी कमी पडेल. एखाद्या विषयाचा फार विस्तार झाला की तो दुसऱ्याच विषयाच्या सीमारेषेवर येतो किंवा चक्क त्या दुसऱ्या विषयातच कसा घुसून जातो याचे हिंसा हे एक उत्तम उदाहरण आहे. विद्यार्थ्यांची हिंसा या विषयावर खोल विचार करताना आपणास असे आढळून येईल की तो एक स्वतंत्र विषयही होऊ शकतो व एक Sociology चा भागही होऊ शकतो. कारण विद्यार्थी शेवटी समाजाचा एक भाग आहे. यालाच Overlapping म्हणतात.

आता हिंसेचे पैलू तरी किती असतात ते आपण बघू–.

(१) Chromosomal Violecne : काही गुन्हेगाराचे Cromosomes च वेगळे असतात म्हणून त्यांच्या हातून हिंसा घडते.

(२) Violence of Poverty . जेव्हा अस्तित्वच धोक्यात येते तेव्हा निव्वळ जगण्यासाठी काही गुन्हेगार हिंसेच्या आहारी जातात.

(३) Violence for Gain : यात गुन्हेगार गरीब नसतो; पण लोभ व झटपट श्रीमंत होण्यासाठी काही लोकाची काहीही करण्याची तयारी असते.

(४) Violence arising out of Frustration : प्रत्येक माणसाला एक अर्ज फार मोठी असते. कदाचित Sexual urge पेक्षाही ही अर्ज तीव्र असते. त्यासाठी तो सारखा धडपडतो. ही अर्ज म्हणजे self expression ची. दोन माणसात १०० टक्के विचाराचे दळणवळण अशक्यच. पण जेथे ही अर्ज अगदीच अशक्य आहे तेथे गुन्हे घडण्याची शक्यता जास्त.

(५) Violence arising out of Social Mores : 'मी चारचौघांसारखा जगणार नाही' असे म्हणणे पुष्कळच भयावह बनलेले आहे कारण समाज असल्या लोकांना वाळीत टाकतो. समाज असल्या लोकाची टर उडवतो. अशा Non-conformist अवस्थेत हिंसेचे बीज असू शकते. कारण Isolation या अवस्थेत Creativity व हिंसा या दोन्हीचे बीज असते.

(६) Political Violence : यात मोर्चे, राजकीय खून, बस जाळणे वगैरे प्रकार मोडतात.

(७) Domestic Violence : एकाच घरात भिन्नभिन्न व्यक्तींच्या वास्तव्यामध्ये हिंसा होऊ शकते. विशेष करून अशिक्षित समाजात.

(८) Student Violence : कॉलेजची फी वाढविणे वगैरे अनेक कारणामुळे विद्यार्थी हिंसेचा अवलंब करतात.

(९) Violence for Violence : हा एक हिंसेचा प्रकार सुन्न व थक्क करून सोडणारा आहे. जीवनाची भयानक पोकळी एवढे एकच उत्तर याला असू शकते. या विषयाचा मानसशास्त्रीय अभ्यास ज्याना करावयाचा असेल त्यांनी Anthony Burgess चे क्लॉकवर्क ऑरेंज हे पुस्तक वाचावे. या प्रकारची हिंसा करणारे बरेच लोक तरुण असतात. आणि या तऱ्हेचीच हिंसा फोफावत चालली आहे. या प्रकारात नसतो motive किंवा gain.

(१०) State Violence : व्यक्तीनी हिंसा केली तर त्याला जाब विचारणारे पोलीस असतात. पण देशाने हिंसा केली की त्याला काही उत्तर नसते. युनायटेड नेशन्स वगैरे सर्व देशाच्या हिंसेपुढे नपुंसक ठरले आहेत.

(११) Psychological Violence : कुणाचा सतत छळ करणे, कारण नसताना भांडणे उकरून काढणे, दुसऱ्याला दुःख दिल्याशिवाय चैन न पडणे वगैरे saddism चे प्रकार यात बसतील.

(१२) Low Threshold Violence : प्रत्येक व्यक्तीत सहनशीलतेचा उंबरठा कमी जास्त प्रमाणात असतो. उदाहरणार्थ, शिवीगाळ करून एखादी व्यक्ती हमरीतुमरीवर येणार नाही, पण दुसरी एखादी व्यक्ती त्याच कारणावरून हातघाईवर येऊन हिंसा करते.

१३) Ethnic Violence : कित्येक जमाती अशा असतात की त्याना हिंसा करावयाचे काही वाटतच नाही. उदाहरणार्थ, फासेपारधी, मारवाडी कुंभार व इतर भटक्या जमाती.

१४) Environmental Violence : शहराचा बकालीपणा, प्रदूषण. । सततच्या ध्वनिप्रदूषणासारखी sensory bombardment, गर्दी व यासारख्या अनेक कारणामुळे हिंसेचा प्रादुर्भाव होऊ शकतो. एकदा एका बिहेवियरल सायकॉलॉजिस्टने एक प्रयोग केला होता. त्याने एका कमी जागेत दाटीने उंदीर सोडले व ते कसे वागतात हे अभ्यासिले. काही काळानंतर उंदीर विचित्र वागू लागले. व कारण नसताना एकमेकांचे चावे घेऊ लागले.

१५) Alcoholic Violence : दारूच्या नशेत खून वगैरे बाबी आपण पुष्कळ वाचलेल्या किंवा ऐकलेल्या आहेत.

१६) Sexual Violence : बलात्कार करून स्त्री तक्रार करू शकणार नाही म्हणून तिचा खून करणे. वेश्यागमनापासून निर्माण झालेल्या भांडणावरून खून वगैरे हे प्रकार यात येतात.

असे हे हिंसेचे मुख्य प्रकार असतात. हिंसा ही आपल्या जीवनात इतकी व्यापक, इतकी अटळ आहे की वरील प्रत्येक आयटेम वर एक Ph. D. चा थिसीस सहज होऊ शकेल.

मला वाटते हिंसेबद्दल शिक्षा देताना हिंसा वरील कोणत्या प्रकारात मोडते हेही बघायला हवे. उदाहरणार्थ Environmental Violence या कक्षेत मोडणारी हिंसा ही व्यक्तीच्या आटोक्यातली नसते. अशा हिंसक गुन्ह्यांना सौम्य शिक्षा व्हावी. आपल्या देशात, जिथे १९१२ चा ल्यूनसी ॲक्ट अजूनही स्टॅच्युटरी आहे तिथे असे होणे अशक्यच. हा कायदा जर अजून प्रचलित आहे तर मग IPC 302 बदलायला अजून अर्धशतक निघून जाईल.

ज्या व्यक्तीवर हिंसा होते त्याचा परिणाम त्या व्यक्तीपुरता राहात नाही, त्या व्यक्तीच्या पायाखालची वाळू तर पार घसरतेच पण सर्व समाजाचा पायासुद्धा थोडा हादरतो, सैल होतो. हिंसेमुळे काही हळूवार मनाच्या व्यक्तीची जीवनावरील श्रद्धाच ढासळते. अमेरिकेत तर घरफोड्या, खून, मारामाऱ्या वगैरे प्रकार ज्या मुलांनी पाहिले आहेत, त्यांना मानसशास्त्रज्ञाकडे न्यावे लागले.

तरुण पिढीचा कल हिंसेकडे अधिकाधिक वाढत आहे. अमेरिकेतील mugging हा प्रकार सर्वांना माहीत आहेच. एकदा अमेरिकेमध्ये अवघ्या सहा डॉलर्ससाठी एका माणसाचे डोके पादचारी मार्गावर आपटले गेले व गुडानी सोड्याची बाटली फोडून एक मोठा अणकुचीदार तुकडा त्याच्या डोळ्यात खुपसून त्याला पार आंधळे करून टाकले.

हिंसेबाबतही It cannot happen to me असा बऱ्याच लोकाचा दृष्टिकोन असतो. पण हिंसा ही अपघातासारखी कोणालाही होऊ शकते. हिंसा झाल्यावर मात्र ती व्यक्ती कायदा व सुव्यवस्थेच्या नावाने आक्रोश करते. ज्या व्यक्तीला हिंसा झालेली असते तिचा cause and effect याच्यावर अजिबात विश्वास राहत नाही मीच का निवडलो गेलो ? माझ्याच ललाटी हे का आले ? या प्रश्नाला उत्तरच नसते. नियती नाही का एखाद्या निष्पाप जीवाची अशीच हिंसा करते ? खुद्द नियतीच जर अशी हिंसा करू शकते तर माणसाला वाटत असावं आपण का करू नये ? हिंसेविषयी लिहिताना एका महत्त्वाच्या गोष्टीचे भान ठेवणे आवश्यक आहे. भय सार्सगिक असते, तेवढ्याच प्रमाणात किंवा त्याहूनही जास्त हिंसा सासंगिक असते. mob violence कशी वणव्यासारखी पेटते हे आपल्याला माहीत आहेच. यानी हिंसा केली, त्यानी हिंसा केली, मोठ्यानी केली, छोट्यानी केली तर मग मी ती का करू नये ? हिंसा जर कमी करायची असेल तर हिंसक वातावरण कमी करायला हवे. हिंसक चित्रपटांना बंदी घालण्यात यावी. वर्तमानपत्रात आपण इतक्या हिंसक बातम्या वाचतो व आपल्याला वाटते आणखीन एका प्रकाराने काय ते मोठे बिघडणार ?

जबरी चोऱ्या करणारेही हिंसक बनत आहेत असे सिल्बरमेन म्हणतात. हात तोडणे, पाय तोडणे, असे प्रकार वाढत जात आहेत. प्रत्येक शहरात गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. या वाढत्या हिंसेला थोपवून धरण्यासाठी पोलिसाचे कार्य, सामान्य नागरिकाचे कर्तव्य वगैरे विवेचन या पुस्तकात केले आहे.

गरिबी, वेश्याव्यवसाय, व हिंसा ही पूर्ण नाहीशी कधीच होणार नाहीत. परंतु त्याचे प्रमाण कमी रहावे यासाठी प्रत्येक शासनाने पण लावून व अभ्यास करून आराखडे करायला हवेत.

—जे. एन्. पोंडा

## इंदिरा तुफान : पृष्ठ ६ वरून

इंदिरा तुफान : पृष्ठ ६ वरून

कॉंग्रेसने निवडणुकीसाठी समझोता केला होता पण कॉंग्रेस अपक्ष उमेदवाराचा प्रचार करीत आहे असा आरोप करून इंदिरा कॉंग्रेसने तो मोडला. पण देशात सर्वत्र मोठा विजय मिळविणाऱ्या त्या पक्षाला गोव्यात एकही जागा जिंकता आली नाही.

१९७७ च्या निवडणुकीत जनता पक्षाने मुख्यतः उत्तरेकडील राज्यात विजय मिळविला होता. पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश व बिहारमध्ये तर कॉंग्रेसला एकही जागा मिळाली नव्हती. यावेळी राज्यामध्ये तसेच राजस्थान, मध्य प्रदेश व ओरिसामध्ये इंदिरा कॉंग्रेसने मोठे यश मिळविले. पंजाबच्या १३ पैकी १२, हिमाचल प्रदेशच्या सर्व ३ (चौथ्या जागेची निवडणूक नंतर होणार आहे) ओरिसाच्या २० पैकी १९ जागा इंदिरा कॉंग्रेसने जिंकल्या. (इतर राज्याचे पूर्ण निकाल हा लेख लिहीपर्यंत हाती न आल्याने त्याचा उल्लेख येथे केलेला नाही )

पक्षांतराबाबत मतदार काय भूमिका घेतात ? हा या निवडणुकीत महत्त्वाचा प्रश्न होता. कारण फूटपाड्यानी जनता पक्ष फोडल्यामुळेच देशावर निवडणुकीचा प्रसंग आला होता. पण याबाबतीत मतदारांनी सर्वत्र एक भूमिका घेतल्याचे दिसले नाही. राजनारायण यांना त्यानी पाडले पण चरणसिंग व बिजू पटनाईक निवडून आले. मुंबईत श्रीमती मृणाल गोरे यांनी चांगले कार्य केले असूनही केवळ याच कारणामुळे मतदाराचा त्याच्यावर रोष होऊन त्या पराभूत झाल्या. श्रीमती अहिल्या रागणेकरांनी जनताची साथ सोडून लोकदल-कॉंग्रेस आघाडीची साथ धरली म्हणून त्यांनाही मतदारानी पाडले.

निवडणुका संपल्या. आता पुढे काय ? नव्या लोकसभेत विरोधी पक्ष फारच दुबळा झालेला आहे. प्रभावी विरोधी पक्ष उभारण्याचा प्रश्न आपल्यापुढे आहेच. इंग्लंडप्रमाणे तुल्यबळ दोन पक्ष असलेली लोकशाही आपल्याकडे नजीकच्या काळात तरी स्थापन होण्याची शक्यता नाही. एकच प्रभावी विरोधी पक्ष स्थापन होऊ शकला तर ते अधिक चागले पण तोपर्यंतच्या काळात संयुक्त आघाडीशिवाय दुसरा पर्याय नाही. सर्व विरोधी पक्षानी व्यापकसमान कार्यक्रमावर अशी आघाडी उभारण्याचे प्रयत्न करायला हवेत.

जनता पक्ष या पराभवातून पुन्हा सावरू शकेल का ? केवळ विधिमंडळातल्या आणि निवडणुकाच्या राजकारणावर भर न देता विधायक कार्य आणि अन्याय निवारणासाठी संघर्ष यावर पक्ष कार्यकर्त्यांनी लक्ष केंद्रित केले तर त्याचे बळ यातूनही वाढेल पण उणीव आहे ती अशा कार्याला वाहून घेणाऱ्या कार्यकर्त्यांची. यातूनच लोकशाहीचा लढा आपणास लढावयाचा आहे.

□

# चित्रपट

सदानंद बोरसे

## सर्वसाक्षी

'सामना'च्या उदंड यशानंतर निर्माते श्री. रामदास फुटाणे यांनी 'सर्वसाक्षी' हा चित्रपट सादर केला आहे. या चित्रपटाद्वारे ते स्वतः दिग्दर्शनाच्या क्षेत्रातही उतरले आहेत. मानवत हत्याकांडावरून सुचलेली ही कथाही त्यांची स्वतःचीच आहे.

रवी (जयराम हर्डीकर) हा विज्ञाननिष्ठ तरुण आपल्या पत्नीबरोबर–रेखा (अंजली पैंगणकर)– नोकरीनिमित्त एका खेड्यात दाखल होतो. परमेश्वरापासून चमत्कारांपर्यंत कोणत्याही गोष्टीवर श्रद्धा नसलेला आणि शास्त्र, नियम यांच्यावरच पूर्णतः विश्वास असलेल्या रवी खेड्यामध्ये लोकांनाही अंधश्रद्धांपासून वाचवू पाहतो. रवीचे हे उद्योग गावातील देवऋषी, बगळाभगत (विजय जोशी) याला पसंत पडत नाहीत. पुढे गावात लहान मुलांचे खून पडायला लागतात. त्या खुनांचा आरोप रवीवर येतो. रवीला पुढे घडणाऱ्या घटनांचे दृष्टांत/भास होऊ लागतात. त्याआधारे रवी बगळाभगत, गावचा सरपंच (विलास रकटे) आणि हेडमास्तर (अशोक जोशी) यांना खुनी म्हणून रंगे हाथ पकडून देतो. या सर्व कथेच्या दरम्यान रवीची पत्नी रेखा बाळंतपणात मरते. रवी ज्यांच्या घरी रहात असतो, त्या दादासाहेबांचा (दत्ता भट) पायलट मुलगा अपघातात मरतो. मग म्हसोबा-सटवाई न्यायाने शेवटी रवी व दादासाहेबांची सून सुजाता (स्मिता पाटील) यांचे शुभमंगल होते. अखेर रवी खेड्यातच राहून या अंधश्रद्धांशी लढा द्यायचा ठरवतो.

चित्रपटात गूढ अपार्थिव शक्तींचे अस्तित्व मान्य करून टाकले आहे किंवा गृहित धरले आहे. अर्थातच असे अस्तित्व जाणवून देणाऱ्या गोष्टी कथेत आल्या आहेत. उदाहरणार्थ रेखाच्या मृत्यूनंतर सुजाताने रेखाच्या मुलाचा सांभाळ करण्याचे वचन दिल्यानंतरच पिंडाला कावळा शिवणे किंवा रवीला भविष्यात घडणाऱ्या घटनांचे होणारे दृष्टांत. चित्रपटात शेवटीही श्रद्धा वा विज्ञान यातील एका पक्षाची बाजू न स्वीकारता 'गूढ शक्तींची भक्ती करणारा मार्ग–श्रद्धांचा. गूढ शक्तींचा शोध घेणारा मार्ग–विज्ञानाचा.' असा सुवर्णमध्य काढला आहे. श्रद्धा आणि विज्ञान या दोन्ही मार्गांवर चालणारी माणसे, त्यांचे परस्परांशी (क्वचित स्वतःशीही) होणारे संघर्ष आणि त्यातून जुळणारे, तुटणारे, पुन्हा जोडले जाणारे संबंधांचे धागे अशी वाटचाल 'सर्वसाक्षी' करीत राहतो. शिवाय या गूढ शक्ती, हे श्रद्धा वा विज्ञानाचे मार्ग यांचे मूळ प्रत्येकाच्या अस्तित्वासाठीच्या झगड्यात आहे. बगळाभगताचा रवी मास्तरच्या विज्ञाननिष्ठ प्रयत्नांना आक्षेप आहे. तो स्वतः बगळाभगत आपल्या श्रद्धेच्या मार्गाला घट्ट चिकटून आहे म्हणून नव्हे तर रवीच्या प्रयत्नांमुळे गावकऱ्यांचा भगतावरील विश्वास उडण्याची शक्यता आहे, तसे झाले तर त्याला गावात जगणे अशक्य आहे. म्हणून त्याचे रवीशी वैर. आपल्या श्रद्धेच्या मार्गावर जर बगळाभगताचा दुर्दम्य विश्वास असता तर रवीवर चेटूक करूनच त्याने त्याचा काटा काढला असता, खून झालेल्या घटनेचे पुरावे रवीच्या घरी लपवून त्याने रवीला अडकविण्याचा प्रयत्न केला नसता. हीच गोष्ट रवीच्या बाबतीतही आहे. बाळंतपणात पत्नीचा मृत्यू झाल्यावर त्याचेही यथार्थ व शास्त्रीय स्पष्टीकरण मागणारा रवी शेवटी आपल्याला होणाऱ्या दृष्टांताचाच आधार घेतो.

चित्रपटाची पटकथा व संवाद भास्कर व मीना चंदावरकरांचे आहेत. संवाद ही चित्रपटाची एक मोठी जमेची बाजू. "अरे, गुरुजींना बाळ झालंय." "चल, गुरुजींना नाही काही, त्यांच्या ––––" अशा हलक्याफुलक्या संवादांपासून "हे बघ, आपल्याजवळ जे नाही त्याचं दुःख करण्यापेक्षा आपल्याजवळ जे आहे ना, त्यात आनंद मानावा माणसानं." अशा किंचित तात्त्विक पातळीवर जाणाऱ्या संवादापर्यंत सगळेच संवाद चित्रपटातील प्रसंगांमध्ये चपखल बसले आहेत. (चित्रपटात जे प्रसंगच अनावश्यक आहेत, त्यांतही काही ठिकाणी संवाद मात्र छान आहेत.) चित्रपटाच्या पटकथेत मात्र काही अनावश्यक तर काही गोष्टी धंद्याशी तडजोड म्हणून ठिगळलेल्या वाटतात उदाहरणार्थ – निळू फुल्यांकडे गावच्या सरपंचाने आणि गावातील दुसऱ्या एका गृहस्थाने

(राम नगरकर) येऊन त्यांना आपल्याला नाटकात हिरो करण्याची विनंती करणे हा असा एक अत्यंत अनावश्यक प्रसंग. त्या प्रसंगात काही फुटकळ विनोद, जातीयवाद, ग्रामीण-शहरी संबंध अशा काही गोष्टींवर रद्दड मल्लीनाथी करून तो रंगविण्याचा प्रयत्न केला असला; तरी निष्कारणच चार-पाच मिनिटांची फिल्म आणि निळू फुले व राम नगरकर हे कलाकार वाया दवडले आहेत. हीच गोष्ट 'कुणी शोध करा सखयाचा' या गीताबद्दल आणि अन्य एका कोळीगीताबद्दल. 'कुणी शोध करा सखयाचा, भेटवा राघू मैनेचा' हे आशा भोसल्यांनी गायलेले गीत अप्रतीम आहे आणि इतके सुंदर गाणे चित्रपटात घेण्याचा मोह टाळणे अशक्यच होते; पण म्हणून ते ज्या प्रकारे चित्रपटात घुसडले आहे तो प्रकार कळण्यापलीकडचा. रवी एका कलावंतिणीकडे जाऊन ते गीत ऐकतो. रवी तिकडे का जातो, त्यातून रवीचे कलासक्त मन दाखयायचे आहे का, ते गाणे म्हणणारी ती बाई नक्की कोण (तिच्या हावभावांवरून ती कोठीवाली तवायफ वाटते) इत्यादी प्रश्न प्रेक्षकाने विचारू नयेत; फक्त डोळे मिटून ते गाणे ऐकावे व गाणे संपले की पुढचा चित्रपट बघू लागावे. दुसरे कोळीगीत आणि त्यावेळचे नृत्यही आहे छान. पण दोन्हीचा चित्रपटाच्या कथाविषयापेक्षा चित्रपटाच्या धंद्याविषयाशी संबंध जास्त, किंबहुना फक्त त्याच्याशीच संबंध. अत्यंत संयमित हाताळणी हे संपूर्ण चित्रपटाचे वैशिष्टय आहे; पण तरीसुद्धा बरेचदा प्रसंग त्याचे उत्कर्षबिंदू गाठण्यापूर्वीच संपवल्यासारखे वाटतात. विशेषतः बगळाभगताने कोंबडे, बकरू व लहान मुलाचा बळी देणे हे प्रसंग अंधारे वातावरण, भारलेले संगीत, बगळाभगत आणि त्याचा साथीदार बारक्याचे विरूप चेहरे, बगळाभगताचे हिंस्र डोळे, अद्भुत मंत्रोच्चारण या सगळयाच्या मदतीने विलक्षण गूढ बनत असले तरी परिणामाच्या दृष्टीने अर्धवट. आणि त्यामुळेच तीव्रतेत कमी वाटतात. याउलट चित्रपटातील भावनोत्कट प्रसंग (जे अन्य चित्रपटांमधून हमखास अतिनाटयमय घेतले जातात) मात्र या संयमित शैलीमुळे विलक्षण प्रभावी झाले आहेत. दादासाहेबांच्या मुलाचा मृत्यू, रवी व रेखाचे अतिशय नैसर्गिक व सहज प्रणयप्रसंग, रेखाचा मृतदेह पाहिल्यानंतरची रवीची प्रतिक्रिया, रवीची अटक अशी या प्रसंगाची किती तरी उदाहरणे देता येतील.

चित्रपटात प्रकर्षाने लक्षात राहणारे पात्र म्हणजे सुजाता. विलक्षण जिवंत डोळे, कित्येक संवादांचे काम करून जाणारे त्या डोळयांचे looks, जबरदस्त मुद्राभिनय आणि विलक्षण सहजता यांच्या जोरावर स्मिता पाटीलने सुजाताची व्यक्तिरेखा तिच्या अनेक पदरांसकट उभी केली आहे, अतिशय बारकाव्यानी विणली आहे. चित्रपटातील सर्वात जास्त भाव खाऊन जाणारे पात्र म्हणजे विलास रकटेने उभा केलेला सरपंच. गावात होणाऱ्या प्रत्येक भल्याचे श्रेय काही न करता उपटणारा इरसाल सरपंच, सुजातापासून तमासगिरणीपर्यंत सगळया बायकावर नजर ठेवणारा स्त्रीलंपट सरपंच, गुप्तधनाच्या आशेने बगळाभगताच्या बोटावर नाचायला तयार असलेला लोभी सरपंच आपल्या नैसर्गिक देहयष्टीच्या आणि अभिनयाच्या जोरावर विलास रकटेने अट्टल सादर केला. जयराम हर्डीकर, दत्ता भट, विजय जोशी, अशोक जोशी, अंजली पैंगणकर या अन्य प्रमुख कलाकारांबद्दलही थोडयाफार फरकाने हेच लिहावे लागेल. एक-दोन प्रसंगात मात्र दत्ता भटांनी केलेला आरडाओरडा म्हणजे नाटकी धसमुसळेपणा वाटतो. (उदाहरणार्थ— रवीच्या घराची झडती आणि रवीची अटक.) चित्रपटात दोन छोटया प्रसंगांमध्ये पत्रकाराच्या भूमिकेत डॉ. मोहन आगाशे आणि डॉक्टरच्या भूमिकेत डॉ. रजनीकांत आरोळेही भेटतात आणि मानवी प्रयत्न, त्याला मिळणारे अपेक्षित-अनपेक्षित फळ, नियती नामक ताकद, खेडेगावातील लोक, त्यांची जीवनपद्धती, त्यांचे विचार, श्रद्धा इत्यादी अनेक विषयांवर वाद करून आणि या वादविषयांच्या नाण्याची एकेक बाजू दाखवून जातात. या दोन्ही प्रसंगांमध्ये आणि त्यामधून झालेल्या चर्चेमध्येही कोणतीही एकच बाजू स्वीकारून तिचा पाठपुरावा करण्याचा प्रचारकी अभिनिवेश टाळला आहे.

चित्रपटाचे संगीत आहे पं. भास्कर चंदावरकरांचे. चित्रपटातील गीतांबद्दल आधी लिहिले आहेच. आशा भोसल्याचे 'कुणी शोध करा सख्याचा' हे गीत शाहीर विरोबांनी लिहिले आहे. प्रसंगांचा एक अविभाज्य घटक बनून जाणारे पार्श्वसंगीत हे चित्रपटाचे वैशिष्टय. पार बळीच्या प्रसंगातील गूढ पार्श्वसंगीतापासून कडकलक्ष्मीच्या मिरवणुकीतील संगीतापर्यंत सगळयाचाच उल्लेख करावा लागेल; पण प्रकर्षाने लक्षात राहते ते रवीचे तबलावादन. प्रसन्नता, एकाकीपणा, विषाद इत्यादी अनेक भावछटा या तबल्याने आकारल्या, रंगवल्या.

चित्रपटात एक डोळा दिग्दर्शकाचा तर दुसरा छायाचित्रकाराचा असतो; तेव्हा आतापर्यंत केलेल्या वर्णनात खूप मोठा वाटा व श्रेय छायाचित्रकाराचे हे वेगळे सांगायला नकोच.

वेगळा विषय निवडून काढलेला 'सर्वसाक्षी' एक स्वतंत्र चित्रपट म्हणून चांगला आहेच; पण आजच्या भिकार व टुकार हिंदी चित्रपटांच्या रणधुमाळीत त्याच्या सर्व गुणदोषांसकट तो एक उत्कृष्ट चित्रपट वाटेल. □

# प्रतियोगी सहकारिता

मुखपृष्ठ २ वरून

नाही मंजूर नाही. ७७ सालीही स्थिरतेसाठीच जनता पक्षाच्या पदरात एवढी बहुसंख्या मतदारांनी टाकली. जनता पक्षाने, आघाडीने म्हणा हवे तर, ही लोकांची स्थिरतेची गरज ओळखली नाही. फालतू प्रश्न निर्माण करून स्थिर सरकार मोडले, राजकारणाचा चुथडा करून टाकला. हा चुथडा पुन्हा नको, अराजक नको असे लोकांनी म्हटले व इंदिरा गांधीना पुन्हा सन्मानाने बोलावले, फ्रान्समध्ये राजकीय अस्थिरता टाळण्यासाठी तेथील मतदारांनी द गॉलला पुन्हा बोलावले, तसेच हे इंदिरा गांधीचे पुनरागमन आहे. लोकशाहीचा अर्थ राज्यकर्ते बेजबाबदारपणा असा घेऊ लागले तर मतदाराना तरी दुसरा पर्याय काय असू शकतो? फ्रान्स हा सुशिक्षितांचा देश आहे, आर्थिकदृष्ट्या प्रगत आहे. पण तेथेही राजकीय स्थैर्य हवे असे लोकांनी ठरवले व स्वातंत्र्य, समता, बंधुता यांची ग्वाही देणाऱ्या भूमीतही द गॉलची हुकुमशाही आली. आपला तर विभूतीपूजकाचा देश. शिक्षण कमी, प्रचंड दारिद्र्य. दिल्लीत कुणीतरी आपला रक्षणकर्ता आहे, तो आपले भले करील, आपल्यावर होणारे अन्याय-अत्याचार निवारील अशी मनोरचना जर येथील सर्वसामान्याची बनली असेल तर त्यात अस्वाभाविक असे काही नाही. हजारो वर्षांचा अनुभव व संस्कार याचा हा परिणाम आहे. ब्रिटिश गेल्यावर नेहरूंनी ही येथील जनतेची मानसिक गरज पूर्ण केली व जनता पक्षाला हा वारसा काही चालवता आला नाही. आज तो इंदिरा गांधीकडे पुन्हा आला आहे. हा वारसा साभाळून त्या प्रगतीकडे आगेकूच करतील की देशाचा पुन्हा एक मोठा तुरुंग बनवतील हे आज काही सागता येत नाही. भाकिते तर खूप झालेली आहेत. यशवंतराव चव्हाण म्हणाले की, इंदिरा गांधी सत्तेवर आल्या तर निवडणुका पुन्हा होणारच नाहीत, हिटलर-मुसोलिनीप्रमाणे हुकुमशाही राजवट देशावर लादली जाईल, वगैरे. आता त्या राजरोस मार्गाने सत्तेवर आलेल्या तर आहेत. त्या हिटलर-मुसोलिनी ठरतात की द गॉल-प्रमाणे मर्यादित स्वातंत्र्याची हमी देऊन देश बळकट करतात हे आज काय सांगणार? दोन्ही शक्यता नाकारता येत नाहीत. इंदिरा गांधीबरोबरच संजय–चौकडीही आलेली आहे. इंदिरा गांधी आणि ही चौकडी यात मूलभूत फरक आहे– इंदिरा गांधी हा देश कुणालाही विकणार नाहीत. अगदी रशियालासुद्धा. डाव्याना म्हातारचळ लागला असे त्यांचे टीकाकार कितीही म्हणोत. पण इंदिरा गाधीचे त्यानी केलेले विश्लेषण फारसे चूक नाही. इंदिरा गांधी या मूलत: साम्राज्यवादविरोधी शक्तीचे प्रतीक आहेत व गोरगरीबच नाही तर येथील राष्ट्रीय वृत्तीच्या मध्यमवर्गाचाही त्याना याचसाठी आजवर पाठिंबा लाभत आलेला आहे. आणि साम्राज्यवाद तर आता आपल्या दाराशीच भिडला आहे. अफगाणिस्तानात रशिया घुसला आणि याचे निमित्त करून पाकिस्तानात अमेरिका हातपाय पसरायला सज्ज झाली. समर्थ व एकसंध भारत ही त्यामुळे आपली प्रधान गरज ठरली अशीच गरज फ्रान्समध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झाली होती व द गॉल पुढे आला. अमेरिका आणि रशिया या दोन्ही साम्राज्यवादी शक्तींविरुद्ध त्याने फ्रान्सला खडे करून दाखवले. इंदिरा गांधीजवळ अशा प्रेरणा आहेत हे त्याचे आजवरचे चरित्र पाहता कुणालाही मान्यच करावे लागेल. पण अशा प्रेरणा बन्सीलाल आणि शुक्लांजवळ आहेत कां? नाहीत. त्रिवार नाहीत. त्यामुळे त्या द गॉल ठरतात की हिटलर–मुसोलिनी ठरतात हे आजच काही सांगवत नाही. चौकडीच्या त्या गुलाम ठरल्या, विधीनिषेधशून्य राजकारणाची त्याना कायम सवयच जडली तर विरोधकांनी तुरुंगाचा, भूमीगत चळवळीचा रस्ता आजपासूनच ओळखीचा करून ठेवायला हरकत नाही. त्यांच्या वडिलापासून, लहानपणी त्यांना आकर्षित करणाऱ्या जोन ऑफ आर्कच्या चरित्रापासून त्यांना लाभलेल्या प्रेरणा जर प्रभावी ठरत गेल्या तर शक्यताही आहे की, त्या द गॉल-प्रमाणे हा देश साम्राज्यशाही शक्तीच्या दडपणांपासून वाचवू शकतील आणि त्यासाठी हिटलर–मुसोलिनीप्रमाणे देशाचा तुरुंग करण्याची, विरोधकाचे जीव घेण्याची किंमत मागणार नाहीत. अर्थात विरोधकांनीही लोकशाही–लोकशाही म्हणून राजकारणाचा चुथडा करण्याचे स्वातंत्र्य मनमुराद उपभोगता कामा नये. अटलबिहारी वाजपेयी-सारख्या मोजक्या नेत्याना याची जाणीव आहे. तुरुंगाची तयारी आणि तळापासून पक्ष बांधणीची निकड या दोन्ही गोष्टीचा त्यांनी निवडणुकीवरील आपल्या प्रतिक्रियेत उल्लेख केला आहे तो सूचक आहे. वावदूकगिरी टाळून लोकसभेत विरोधी पक्षाची भूमिकाही बजवायची व समर्थ पक्ष बाधणीकडेही लक्ष पुरवायचे अशी दुहेरी कामगिरी त्यांनी आपल्या डोळ्यासमोर ठेवलेली दिसते. याचाच अर्थ प्रतियोगी सहकारितेचे टिळक तत्त्व अंमलात आणायचे. इंदिरा गांधी देशहिताची जी पावले टाकतील त्यांना जरूर तेव्हा, जरूर त्या प्रमाणात साथ द्यायची. पण आपले स्वतंत्र अस्तित्वही अधिकाधिक बळकट व पायाशुद्ध करण्याची दक्षताही बाळगायची. असहकारही नाही आणि लोटांगणही नाही. जेवढ्यास तेवढे, जशास तसे. डांग्याचे विश्लेषण बरोबर होते पण आपले स्वतंत्र अस्तित्व जपण्याची व अधिकाधिक प्रभावी करण्याची दुसरी जबाबदारी त्यानी टाळली त्यामुळे त्याची व त्यांच्या पक्षाची पुढे फरपट झाली व ललित नारायण मिश्राना 'हुतात्मा' ठरवण्यापर्यंत त्यांना इंदिराचरणी लोळण घ्यावे लागले. इदिरा म्हणजे फॅसिझम, इंदिरा म्हणजे हिटलर–मुसोलिनी असा तारस्वर काढण्याचीही लगेच घाई नको आणि असे लोळणही नको. लोकसभेत आणि बाहेरही समर्थ विरोधी पक्ष बांधणीला उघड असा पुष्कळ वाव अजूनही आहे. इंदिरा गाधीही मागील अनुभवावरून काही तरी शिकल्या असतीलच की! निदान तशी अपेक्षा तरी तूर्त करू या! □